

दैनिक

# राज्य लोकतंत्र

गणपती बाप्पा मोरया



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१२६ | रविवार, दि.३१ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# १५ ऑक्टोबरपासून कापूस खरेदीला सुरुवात

## महाराष्ट्रात १५० पेक्षा अधिक केंद्रांच्या माध्यमातून होणार खरेदी

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात १५ ऑक्टोबरपासून कापूस खरेदीला सुरुवात होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. सीसीआयचे अध्यक्ष ललित कुमार गुप्ता यांनी यांनी ही माहिती दिली. भारतीय कापूस महामंडळाच्या (सीसीआय) माध्यमातून या वर्षी देशभरात सुमारे ५५० तर महाराष्ट्रात सुमारे १५० पेक्षा अधिक केंद्रांच्या माध्यमातून खरेदी होणार आहे.**



केंद्र सरकारने कापड उद्योगाच्या मागणीनुसार कापसावरील ११ टक्के आयात शुल्क ३१ डिसेंबरपर्यंत काढून टाकले. त्यामुळे कापसाची आयात वाढणार असल्याने कापसाचे भाव दबावात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढीस लागली आहे. केंद्र सरकारने कापसाला यंदा प्रति क्विंटल ८११० रुपयांचा हमीभाव जाहीर केला आहे. मात्र शुल्कमुक्त आयात धोरणामुळे खुल्या बाजारात कापसाच्या किमती हमीभावापेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांचा सरकारी खरेदीकडे ओढा असेल. यंदाच्या हंगामात सीसीआयच्या केंद्रांवर कापसाची विक्रमी आवक होण्याचे संकेत आहेत. गेल्या हंगामात सीसीआयने सुमारे २५ लाख क्विंटल कापसाची खरेदी केली होती. यंदा त्यापेक्षा अधिक कापूस खरेदी केला जाईल, असे सांगितले जात आहे. राज्यात ३८ लाख ३५ हजार ९४७ हेक्टरवर कापूस लागवड आहे. सरासरी १० क्विंटलची उत्पादकता विचारात घेता लागवड क्षेत्रातून सुमारे ४०० लाख क्विंटल कापूस (८० लाख गाठी) उत्पादनाचा अंदाज आहे. सध्या कापूस खरेदीसाठी ८ ते १२ टक्के ओलावा मान्य आहे. ओलावा जसा वाढेल पान २ वर

### १ सप्टेंबर पासून नोंदणीला सुरूवात

कापूस विक्रीसाठी सीसीआयने कपास किसान ॲपवर नोंदणी सक्तीची केली आहे. १ ते ३० सप्टेंबर दरम्यान नोंदणी करता येईल. नोंदणीकृत शेतकऱ्यांना निर्धारीत सात दिवसांच्या स्लॉटमध्ये कोणत्याही दिवशी आणि कोणत्याही केंद्रावर कापूस विकता येईल.

# सात वर्षांनंतर मोदी चीनमध्ये

बिजींग । वृत्तसंस्था

जपानचा दौरा पूर्ण करून पंतप्रधान नरेंद्र मोदी आता शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन शिखर परिषदे निमित्त चीनमध्ये दाखल झाले आहेत. सात वर्षांनंतर त्यांचा हा पहिलाच चीन दौरा आहे. अमेरिकेच्या टॅरिफ वाढीच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनला भेट द्यावी, असे निमंत्रण राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी दिले होते. दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा होण्यासाठी हे महत्त्वपूर्ण मानले जात आहे. कारण २०२० मध्ये सीमावादामुळे दोन्ही देशांमधील संबंधामधील तणाव वाढला होता. दरम्यान, रशिया–युक्रेन युद्धाच्या दरम्यान भारताने रशियन तेलाची खरेदी केली, असे कारण सांगत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर पान २ वर

# मनोज जरांगे मागण्यांवर ठाम सरकारसोबतची बैठक निष्फळ




मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदान येथे मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. त्याठिकाणी नुकतेच ३० ऑगस्ट शनिवारी दुपारी सरकारकडून न्या. शिंदे आणि विभागीय आयुक्त चर्चेला गेले होते. मात्र शिंदे समितीसोबत झालेली पहिलीच चर्चा अयशस्वी झाली आहे. जरांगे यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट लागू करण्यास वेळ देणार नाही. बॉम्बे सरकार, औंध संस्थान पान २ वर

### अजिबात वेळ देणार नाही

आम्हाला ६ महिन्याचा वेळ द्या अशी समितीची मागणी होते. प्रक्रियेसाठी वेळ लागेल तो द्यावा. सरसकट संपूर्ण समाजाला प्रमाणपत्र देता येणार नाही असे शिंदे समितीचे चर्चेत सांगितले. तर मागासवर्गीय आयोग सोडून इतर कुठल्याही मागणीसाठी वेळ देणार नाही अशी भूमिका जरांगे यांनी घेतली.मराठवाड्यातील सर्व मराठा समाज कुणबी असून त्यांना उद्यापासून प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात करा अशी मागणी करण्यात आली.

### आणखी एका आंदोलकांचा मृत्यू

मुंबई येथे आंदोलनात सहभागी असलेल्या विजय घोगरे या मराठा कार्यकर्त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झालाय. हा तरुण लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील टाकळगाव येथील रहिवासी असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, त्याला उपचारासाठी जे.जे रुग्णालयात हलवण्यात आलं होतं. मात्र, डॉक्टरने या कार्यकर्त्याला मृत घोषित केलं आहे.यापूर्वी जुन्नरजवळ सतीश देशमुख या आंदोलकांचा मृत्यू झाला होता.

# ५० टक्क्यांची मर्यादा हटवा

## त्यासाठी घटनादुरुस्ती आवश्यक– शरद पवार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

विविध समाजघटकांकडून आरक्षणाच्या मागण्या वाढल्या असून, मराठा–ओबीसी संघर्ष उभा ठाकला आहे. आरक्षणाची आवश्यकता आहे. ही वस्तुस्थिती आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा अडथळा ठरत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी घटना दुरुस्ती करणे आवश्यक आहे', अशी भूमिका शरद पवार यांनी अहिल्यानगर येथे मांडली.

माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अरुण कडू यांच्या अमृतमहोत्सवी (७५ वर्षे) निमित्ताने येथील सहकार सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शरद पवार म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणासाठी मराठा



समाजाला आरक्षणाची दारे खुली केली. तेव्हापासून आरक्षणाच्या प्रवासाची सुरुवात झाली. मात्र, काळाच्या ओघात विविध समाजघटकांकडून आरक्षणाच्या मागण्या वाढल्या.जर तामिळनाडू ७२ टक्के आरक्षण देऊ शकत असेल, तर महाराष्ट्रासह इतर राज्यांनाही तो मार्ग उपलब्ध व्हायला हवा. त्यासाठी आवश्यक असल्यास घटनादुरुस्ती करावी लागेल. हा प्रश्न केवळ पान २ वर

## थोडक्यात...

### संमतीने ठेवलेले संबंध गुन्हा ठरत नाहीत

सुरतः लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अनेकवेळा बलात्कार केल्याच्या आरोपातून सुरत सत्र न्यायालयाने आरोपी तरुणाची निर्दोष मुक्तता केली. संमतीने शारीरिक संबंध ठेवल्यानंतर लग्नास नकार देणे हा बलात्कार ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा न्यायालयाने निकालात दिला. पीडितेने कोणत्याही दबावाशिवाय हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये आरोपीसोबत स्वतःचे ओळखपत्र दिले होते, त्यामुळे तिच्यासोबत कोणतीही जबरदस्ती झाली नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. आरोपीसोबत लग्न होऊ शकत नाही हे स्पष्ट झाल्यानंतरही पीडितेने शारीरिक संबंध सुरू ठेवले, असेही न्यायालयाने नमूद केले.

### उद्धव ठाकरेंचा मनोज जरांगेंना फोन

मुंबई : राज्यातील मराठा आंदोलकांनी मुंबईत धडक दिली असून उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू झाले आहे. या उपोषणाला महाविकास आघाडीतील अनेक नेते, आमदार, खासदार भेट देऊन आपली भूमिका मांडत आहेत. शिवसेना नेते आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनस्थळी भेट देत त्यांच्यासमवेत चर्चा केली. विशेष म्हणजे या भेटीत शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी त्यांनी फोनवर बोलणेही करुन दिले. विशेष म्हणजे दीड ते २ मिनिटे मनोज जरांगे पाटील यांचे उद्धव ठाकरेंसोबत फोनवर बोलणे झाले.

### अमित शाहांच्या विमानात तांत्रिक बिघाड

मुंबईः केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसीय मुंबई दौऱ्यावर आले असता राज्यातील राजकीय परिस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. मुंबईतील लालबागच्या राजाचे दर्शन घेऊन ते मुंबईतून गुजरातच्या दिशेने रवाना झाले. मुंबईतील आपला दोन दिवसीय दौरा आटोपल्यानंतर ते गुजरातला जाण्यासाठी निघाले असता, त्यांच्या सरकारी विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विमान घेऊन ते गुजरातला गेले आहेत. अमित शाह यांच्या विमानात बिघाड असल्याचे समजताच एकनाथ शिंदेंनी आपले विमान शाह कुटुंबीयांसाठी देऊ केले. त्यानंतर, गृहमंत्री शाह हे एकनाथ शिंदेंच्या विमानाने गुजरातला रवाना झाले.

### रशियाकडून तेल खरेदी सुरुच ठेवणार–ओएनजीसी

भारत रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवत असल्याने अमेरिकेने भारतीय वस्तूंच्या आयातीवर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. त्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. भारतातील सरकारी कंपनी ऑईल अँड नॅच्युरल गॅस कॉर्पोरेशनने रशियाकडून तेल खरेदी करणें सुरुच ठेवू असे म्हटले आहे. जोपर्यंत व्यापारीदृष्ट्या हे योग्य असेल तोपर्यंत तेल खरेदी सुरु ठेवणार अस ओएनजीसीने म्हटले आहे.

### ट्रम्प यांचा कॉल; मोदी भडकले

दिल्लीः अमेरिकेतील न्यूयॉर्क टाइम्स या वृत्तपत्राने हा दावा केला आहे की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला होता. यावेळी भारताने ट्रम्प यांच्या नावाची शिफारस नोबेल शांति पुरस्कारासाठी करावी, अशी मागणी त्यांनी केली होती, असे या वृत्तपत्रात नमूद करण्यात आले आहे. या वृत्तपत्रानुसार, १७ जून २०२५ रोजी ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात फोन कॉल झाला. या कॉलदरम्यान ट्रम्प यांनी मोदी यांना नोबेल शांति पुरस्कारासाठी शिफारस करण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. यावर मोदी त्यांच्यावर चांगलेच संतापले होते, असे न्यूयॉर्क टाइम्सने आपल्या वृत्तात म्हटले आहे.

# ९ सप्टेंबर पर्यंत पगार न दिल्यास शिक्षकांचे ठिय्या आंदोलन

पुणे । प्रतिनिधी

**शासनाने आदेश देवूनही रात्र शाळा, ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट पेड इन सप्टेंबर महिन्याचे पगार झाले नाहीत. त्यामुळे शिक्षक भारती संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षण उपसंचालक यांची भेट घेऊन पगार विलंबाबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच ९ सप्टेंबर २०२५ पर्यंत पगार न झाल्यास शिक्षक भारती संघटना शिक्षण उपसंचालक कार्यालयात ठिय्या आंदोलन करणार, असा इशारा शिक्षक भारती संघटनेने दिला आहे.**

गणपती सणापूर्वी सर्व राज्य शासकीय कर्मचारी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना पगार अदा करण्याच्या शासनाने सूचना दिल्या होत्या. परंतु रात्र शाळा व ज्युनिअर कॉलेजचे जुलै पेड इन ऑगस्ट महिन्याचे पगार अद्याप जमा न केल्याने ऑगस्ट महिन्याची पगार बिले वेतन अधीक्षक कार्यालयात विनाकारण नाकारली जात आहेत. ही अत्यंत चुकीची बाब आहे. यविरोधात शिक्षक भारती संघटनेने तीव्र निषेध पान २ वर

### मराठा समाजासाठी गठीत वंशावळ समितीस पुन्हा मुदतवाढ

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा–कुणबी व कुणबी–मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने दि. ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.

## जरांगे मुंबईत का आले हे शिंदेंना विचारा–राज ठाकरे


मुंबई । प्रतिनिधी

मनोज जरांगे–पाटील मुंबईत का आले? हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच विचारा, असे सूचक विधान मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले आहे. राज ठाकरे यांच्या या विधानाने वेगवेगळ्या राजकीय चर्चांणा जोर चढला आहे.



मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे–पाटील यांनी शुक्रवारपासून मुंबईतील आझाद मैदानावर पुन्हा उपोषणाला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी थेट पान २ वर

# बीडजवळ भीषण अपघात, कंटेनरने चिरडले, सहा जणांचा मृत्यू



बीड । प्रतिनिधी

**धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील एसआर जीनिंग जवळ शनिवारी (दि.३०) सकाळी साडेसातच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव कंटेनरने सहा जणांना चिरडले, या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असूनदोघांचा उपचारदरम्यान मृत्यू झाला आहे. या अपघातात एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून मयत हे बीड तालुक्यातीलच आहेत. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.**

बीड येथील दिनेश दिलीप पवार (रा.माऊली नगर बीड), पवन शिवाजी जगताप (रा.अंबिका चौक बीड), अनिकेत रोहिदास शिंदे (रा.शिदोड ता.बीड), किशोर गुलाब तोर (बाभूळतारा ता.गेवराई), आकाश अर्जुन कोळसे (रा.रिलायन्स पंप परिसर बीड), विशाल श्रीकिसन काकडे वय २२ रा. शेकटा ता.शेगाव) हे पायी चालत पेंडगाव येथे मारुतीरायाच्या दर्शनासाठी जात होते. बीड ते पेंडगाव असा पायी प्रवास करत असताना धुळे– सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील नामलगाव येथील उड्डाणपूल पास करून पुढे असलेल्या एसआर जीनिंगजवळ चालत असताना पाठीमागून भरधाव आलेल्या कंटेनरने पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

# मराठ्यांना झुलवायचे ओबीसींना डीएनए म्हणायचे!

## देवबाप्पा, हीच आहे भाजप सरकारची खरी नीती

भाग तिसरा

सुभाष चौरे

**पुणे–बीडः राज्यामध्ये मराठा आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर दिसत आहे सरकार मात्र चमडी बचाव चा कार्यक्रम करत आहे. एकीकडे मराठा समाजाला आरक्षणाच्या नावावर झुलवत ठेवायचे अन दुसरीकडे मराठा आरक्षणाची भीती दाखवून ओबीसी वोट बँक करण्यासाठी ओबीसी आमचा (भाजप) डीएनए आहे असे म्हणायचे, हीच महायुती सरकारची रणनीती आहे. गणपती बाप्पा या सरकारला सुबुद्धी दे केवळ झुलवत ठेवून किंवा ओबीसी वोट बँकेसाठी नवे फंडे अवलंबून चालणार नाही. आता हे सर्व जनतेच्याही लक्षात आले आहे.**

गणपती बाप्पा आपण सर्व जाणून असाल. आपण बुद्धी देवता आहात या सर्व प्रकरणात आम्ही बोलत आहोत ते आपल्या पुन्हा एकदा लक्षात आणून देण्यासाठी. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी गेल्या दोन वर्षांपूर्वी उपोषणाला सुरुवात केली. जरांगे यांनी ओबीसीतून आरक्षण हा हट्ट धरला ती त्यांची मागणी आहे, त्यावर फार बोलायचे नाही. पण आरक्षण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यादरम्यान त्यांच्यावर व त्यांच्या आंदोलकावर झालेल्या लाठी हल्ल्यानंतर या आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले आणि त्याचा वनवा महाराष्ट्रभर पेटला गेला. आता ते विजवण्याची ताकद जरांगे पाटलामध्ये आहे ना सरकार मध्ये आहे. कारण गरीबातला गरीब मराठा आरक्षणासाठी स्वतः पेटून उठला आहे पान २ वर



## अग्रलेख

# घटनादुरुस्ती करून संविधान बदलण्याचा सुप्तहेत !

ऑगस्ट २०२५ पर्यंत भारतीय राज्यघटनेत एकूण १०६ दुरुस्त्या झाल्या आहेत. १३० वी ही प्रस्तावित आहे, अद्याप पास झालेली नाही. बहुतेक वेळा सत्ताधारी पक्ष घटनादुरुस्ती राजकीय कारणाने करतो हे भारताच्या राजकीय इतिहासात स्पष्टपणे जाणवते. बहुतेक दुरुस्त्यांमध्ये काही ना काही राजकीय संदर्भ असतो. काही महत्त्वाच्या दुरुस्त्या विवादास्पद, न्यायालयीन निर्णय उलटवण्यासाठी, आणीबाणी काळात किंवा राजकीय फायद्यासाठी केल्या गेल्यात. घटनादुरुस्तीला राज्यांची मान्यताही लागते

संघराज्याचा ढाचा बदलणाऱ्या काही महत्त्वाच्या दुरुस्त्यांसाठी राज्यांचीही संमती लागते. उदा. राष्ट्रपतींची निवड, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयांचे अधिकार, राज्यसभा संरचना, केंद्र-राज्य अधिकार विभागणी. अशा वेळी संसदेत विशेष बहुमताने विधेयक पास झाल्यानंतर किमान अर्ध्या राज्य विधानसभांची मंजुरी मिळाली पाहिजे तरच ते कायदा बनण्यासाठी राष्ट्रपतींकडे सहीसाठी पाठवता येते. संसदेतून आणि आवश्यक असल्यास राज्यांतून मंजूर झाल्यानंतर, विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवले जाते. राष्ट्रपती यावर व्हेटो वापरू शकत नाहीत. त्यांना मंजुरी द्यावीच लागते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर ते घटनादुरुस्ती अधिनियम म्हणून लागू होते. १९७३ मधील केशवानंद भारती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ठरवले की संसदेला दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे, पण मूलभूत रचना बदलता येणार नाही. पण आजचे सत्ताधारी हा मूलभूत ढाचाच बदलू पाहत आहेत असे जाणवते.

राज्यघटनेतील १३०व्या घटनादुरुस्ती विधेयकाने वाद निर्माण केला आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री वा मंत्री सलग ३० दिवस तुरुंगात राहिल्यास पद आपोआप रिक्त होण्याची तरतूद यात आहे. सरकार हे भ्रष्टाचारविरोधी पाऊल असल्याचे सांगत असले, तरी हे राजकीय हत्यार ठरू शकते. भारतीय राज्यघटनेत आजपर्यंत एकूण १०६ दुरुस्त्या झाल्या आहेत. संसदेत कोणत्याही सभागृहात लोकसभा किंवा राज्यसभा दुरुस्ती विधेयक मांडले जाऊ शकते. हे विधेयक फक्त खासदार मांडू शकतो. तो सदस्य असो किंवा मंत्री. दुरुस्तीचे स्वरूप लक्षात घेऊन तीन प्रकारच्या बहुमतांची गरज असते. फक्त उपस्थित सदस्यांच्या साध्या बहुमताने पास होणाऱ्या दुरुस्त्या, उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने आणि त्या सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त बहुमताने मंजुरी आवश्यक असते. बहुतेक दुरुस्त्या या पद्धतीनेच होतात. त्यानंतर ते राष्ट्रपतींकडे स्वाक्षरी जाते आणि नंतर तो कायदा होतो. परंतु काही घटनादुरुस्ती विधेयके राजकीय हेतूने निर्माण केली जातात. जसे हे १३० वे घटनादुरुस्ती विधेयक आणले गेले. म्हणूनच ते संयुक्त समितीकडे सोपवले गेले. देशात घटनादुरुस्ती करून संविधान बदलण्याचा सुप्तहेतू कार्यरत असल्याची शंका पुन्हा डोके वर काढत आहे.

भारतीय राज्यघटनेचे वे१३० दुरुस्ती विधेयक हे २० ऑगस्ट २०२५ रोजी लोकसभेत गृहमंत्री अमित शहा यांनी सादर केले. हे विधेयक राज्यघटनेतील कलम ७५ मध्ये बदल सुचवते, ज्यामुळे गंभीर गुन्ह्यांसाठी पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षेची तरतूद असलेले गुन्हे केलेल्या आणि अटक झालेल्या तसेच ३० दिवस सलग तुरुंगात असलेले पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि इतर मंत्री यांना पदावरून काढून टाकले जाईल. राष्ट्रपती हा काढून टाकण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने घेतील आणि जर ३१ दिवसांत असा सल्ला दिला नाही तर मंत्री आपोआप पदमुक्त होईल. विधेयकानुसार, तुरुंगातून सुटका झाल्यानंतर वा दोषमुक्त झाल्यावर पुन्हा नियुक्ती शक्य आहे. हे विधेयक राज्यघटनेतील नैतिकता, चांगले शासन आणि जनतेच्या विश्वासाला मजबूत करण्यासाठी असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. हे विधेयक सादर होताच विरोधी पक्षांनी जोरदार विरोध केला आणि लोकसभेत गोंधळ झाल्याने ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले. सरकारच्या मते हे विधेयक राजकीय भ्रष्टाचाराविरोधात आहे, पण हे राजकीय हत्यार म्हणून विरोधकांवर आणि सत्तेत असणाऱ्या मित्रपक्षातील नेत्यांना चाप लावण्यासाठी आणण्यात आल्याचे दिसत आहे. केंद्र सरकार सीबीआय आणि ईडीसारख्या केंद्रीय यंत्रणांचा वापर करून विरोधी नेत्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवू शकते, ज्यामुळे राज्य सरकारे अस्थिर होतील. हे कलम सत्ताधाऱ्यांना कायम शक्तिवान करण्यासाठी आणि सर्व सत्ता एकहाती ठेवण्यासाठी वापरले जाईल. संघराज्यवाद आणि न्यायिक पुनरावलोकन या राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेवर देखील हा एकप्रकारे हल्ला आहे. हे विधेयक मोदी सरकारच्या राजकीय भ्रष्टाचाराविरोधातील प्रतिबद्धतेचा भाग असल्याचे सांगितले जात आहे, पण ते संघराज्यवादाला धोका असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

## संपत सांगळे यांचे दु:खद निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



**कडा शहराचे माजी सरपंच तथा उद्योगपती संपत दादा सांगळे यांचे ह्दय विकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्यावर कडा येथील स्मशानभूमीत हजारोंच्या संख्येने जनसमुदायच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.**

कडा शहराचे माजी सरपंच संपत सांगळे यांचे शनिवार (दि.३०)रोजी दुपारी ४ च्या दरम्यान ह्दय विकाराच्या झटक्याने राहत्या घरी निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ५३ होते.त्यांच्यावर कडा येथील स्मशानभूमीत रात्री ७.३० वा.हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## जीवनातील विविध प्रसंग,घटना अचुक सांगणारे लोखंडे महाराज

**आष्टी । प्रतिनिधी**

**राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला एक अदभुत किमया अवगत आहे.लोखंडे महाराज आपल्या अदभुत लॉजीकने पुढील व मागील अनेक वर्षमधील सणावारांच्या तारखा अगदी अचुकपणे सांगतात. एवढेच नाही तर समोरील माणसांच्या जन्मतारखा देखील वारासह सांगतात. पाटोदाजवळ असलेल्या दिघोळ येथील राजेंद्र गंगाराम लोखंडे हे काही वर्षांपूर्वी शिक्षण व कामाच्या निमीत्ताने पाटोदा शहरात आले आणि येथेच स्थायिक झाले.**

शाळेत असल्या पासुनच राजेंद्र लोखंडे हे अध्यात्मिक वृत्तीचे आहेत. काहीसे गुढ वागत, त्यावेळी खेमानंद महाराज यांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले होते. पाटोद्यात आल्यानंतर त्यांनी एम.ए.पर्यंतचे आपले शिक्षण पूर्ण करून काही काळ ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत नोकरी ही केली मात्र त्यांच्या अध्यात्माकडेच अधिक कल राहीला. महाराज ब्रम्हचारी आहेत.दरम्यान त्यांच्या या गुढ वागणुकीतुनच त्यांच्यातील अनोख्या तर्कशक्तीची जाण होऊ लागली.एकादा अनोळखी व्यक्ती जरी त्यांच्यासमोर गेला आणि त्यांना वाटले तर ते व्यक्तिची जन्मतारीख वारासह अगदी अचुकपणे सांगतात.त्यांच्या तारखेच्या तर्कशास्त्रानुसार त्या व्यक्तिच्या जीवनात भविष्यत घडू शकणाऱ्याही काही घटनांचा वेध सांगु शकतात.वर्तविलेले अंदाज खरे ठरू लागले आहेत.माजी मंत्री आ.धनजंय मुंडे व लोकनेत्या पंकजाताई मुंडे हे बहीणभाऊ मार्च २०२४ मध्ये राजकारणात एकत्रीत येतील असा २०२० साली (चार वर्षापुर्वी) भविष्य सांगणारे लोखंडे महाराज आहेत.मानवी जीवनातील गूढ वागुणुकीचे तर्कशास्त्र लोखंडे महाराज यांना अवगत आहे. मनुष्याचा फक्त चेहरा पाहून ते



जन्मतारखेपासून, मृत्युच्या तारखे पर्यंतचा जीवनपट सांगतात,लोखंडे महाराजांनी राज्याच्या व बीड जिल्हयाच्या राजकारणावर आपले अंदाज व मत नोंदवले २०४० साली नोव्हेंबर महीन्यात ४ तारखेला दिवाळी आहे.त्यादिवशी रविवार असेल, २०५५ साली २४ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री बुधवार रोजी असेल, १९४७ साली ६ मार्च रोजी होळीचा सण होता.तो दिवस बुधवारचा होता.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तो वार शुक्रवार होता अशा प्रकारे पुढील व मागील ५० वर्ष आणि त्याहीपेक्षा अधिक वर्षातील सणांच्या तारखा अगदी क्षणात कुणी बिनचुक सांगु शकेल यावर कोणाचा चटकन विश्वास बसणार नाही मात्र पाटोदा येथील राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला मात्र ही अदभुत किमया अवगत आहे. पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाकडे जाणाऱ्या रोडवर लोखंडे महाराज राहतात.बालवयात लोखंडे महाराजांवर धार्मिक संस्कार झाले असल्यामुळे अध्यात्माची चांगल्या प्रकारे त्यांना आवड निर्माण झाली आहे. भगवान शंकराचे ते भक्त आहेत.त्यांना भविष्य जाणण्याची विद्या प्राप्त झाली आहे.माणसाचा जन्मदिनांक, वेळ,तारीख ते अचूकपणे सांगतात. आपल्याकडे हस्तरेषा किंवा चेहरापाहून भविष्य सांगणारी माणसं आहेत पण ज्योतिष शास्त्राचा कसलाही अभ्यास न करता लोखंडे महाराज माणसाच्या जीवनाबाबत ज्या गोष्टी सांगतात हे मात्र आश्चर्यपेक्षा कमी नाही.

## रामकिशन काशिद यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियानचे सेवानिवृत्त सहाय्यक कार्यक्रम अधिकारी तथा माध्यमिक राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक आसाराम काशिद यांचे वडील रामकिसन जानू काशिद साक्षाळ पिंपरी यांचे दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी वृद्धापकाळाने ८७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम स्मशानभूमी मोंढा, बीड येथे ३० ऑगस्ट २०२५ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारास समाजातील सर्व स्तरातील मान्यवर, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत रामकिसन काशिद यांच्या पश्चात समग्र शिक्षा बीडचे माजी सहायक कार्यक्रम अधिकारी आसाराम काशिद, शिक्षक श्रीराम काशिद ही दोन मुले तर मीना सावंत व सविता अर्सुल या मुलीसह जावई, सुना, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. काशिद यांच्या कुटूंबीयावर कोसळलेल्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## देशातील खेळाडू सशक्त कसा बनेल, यासाठी आपण सर्व मिळून काम करू- केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**देशाला २०४७ मध्ये विकसित राष्ट्र बनवायचं असेल, तर नागरिकांसोबत खेळाडूही सशक्त झाले पाहिजेत. देशातील खेळाडू सशक्त कसा बनेल यासाठी आपण सर्व मिळून काम करू असे प्रतिपादन क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रात (एनसीओई) आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री खासदार डॉ. भागवत कराड, साई केंद्राच्या उपसंचालक मोनिका घुगे, सहायक संचालक सुमेश तरोडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. आजपासून भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्राला एनसीओई छत्रपती संभाजीनगर असे नाव मिळाले आहे. ''छत्रपती संभाजी महाराजांच्या नावामुळे हे केंद्र खेळाडूंना नवी ऊर्जा देईल,'' असे राज्यमंत्री खडसे यांनी सांगितले. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. यावर्षीपासून देशभरातील शाळा-महाविद्यालयांमध्ये तीन दिवस विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. ''नव्या क्रीडा धोरणातून खेळाडूंना गुणवत्तापूर्ण सुविधा, आधुनिक प्रशिक्षण आणि प्रोत्साहनपर वातावरण देण्यास केंद्र सरकार कटीबद्ध आहे. छत्रपती संभाजीनगरचे हे केंद्र राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा गौरव करणारे खेळाडू घडवेल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड म्हणाले, ''महाराष्ट्रातील सर्वोत्तम क्रीडा केंद्रांपैकी असलेले साई केंद्र 'फिट इंडिया चळवळी'साठीही महत्वाची भूमिका बजावत आहे.' कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपसंचालक मोनिका घुगे यांनी केले. त्यांनी साई केंद्राच्या कामगिरीची माहिती दिली. या कार्यक्रमास खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द डॉ.जगदीश टेकाळे मानसोपचार तज्ञ आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध

**बीड। प्रतिनिधी**

आपल्या बीड शहरामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द मानसोपचार तज्ञ डॉ.जगदीश टेकाळे हे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी खालील आजाराचे निदान करण्यासाठी उपलब्ध रहात आहेत. १) डोकेदुखी/अती चिंता व काळजी (सतत टेन्शन,घाबरटपणा, घाम सुटणे,थरकाम सुटणे,हाता पायांना मुंग्या येणे)२) नैराश्य/उदासिनता (मनात सतत एक सारके विचार येत राहणे, सतत शंका व्यक्त करणे,अंधारात स्वतःला कोंडून घेणे)३) झोपेच्या समस्या (झोप न येणे, झोपेत चालणे,बडबड करणे,चक्कर येणे, दातखिळी बसणे)४) व्यसनाधिनता (दारु,तंबाखू,गुटखा,मोबाईल गेम,गांजा,चरस,भांग व इत्यादी तत्सम प्रकारच्या व्यसनापासुन मुक्ती)५) बालकांच्या समस्या (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा,चिडचिड पणा,अभ्यासात कमी,अति चंचलता, मतिमंदता, वागणुकीतील बदल,शैक्षणिक समस्या)६) स्मृती भंग (विसरभोळेपणा)७) लैंगिक समस्या (लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे, कमजोरी, स्वप्न दोष,कमी ताठरता,)८) स्क्रिझेफ्रेनिया व इतर मानसिक समस्या ९) मानसिक आजार १०) विसर पडण्याचा आजार११) मानसिक आजारावरील उपचार (संशय घेणे,भुतबाधा,भास होणे,करणी,वेडेपणा इत्यादी)१२)उदासिनता (घबराहट,भिती,आत्महत्येचे विचार,ऐकटेपणा,व्यक्तिमत्व आजार,डोके दुखी व बऱ्याच दिवसापासून होणारी अंगदुखी,सतत चक्कर येणे,एकच विचार,एकच कृती वारंवार करणे.१३) म्हातारपणातील आजार (स्मृतीभ्रंष,निद्रानाष,वेडेपणा,ऐकाकीपणा)१४) समुपदेशन (वैवाहिक व कौटुंबिक कलह,करिअर,अभ्यास,प्रेमभंग इत्यादी)१५) समुपदेशन/ कौन्सेलिंग/थेरपी १६) ताणतणाव नियोजन १७) राग/संताप नियोजन १८) अभ्यास मार्गदर्शन १९) मनोलैंगिक समस्या : लैंगिक कमजोरी, शीघ्रपतन, स्वप्नदोष,लैंगिक समाधान, इच्छेचा अभाव, २०) नैराश्य, उदासपणा, मानसिक ताणतणाव, आत्महत्तेचे विचार २१) मनात एकच विचार/शका वारंवार येणे, वारंवार एकच कृती करणे २२) वयसकर माणसांच्या विसरण्याची सवय २३) सर्व तपासण्या/ रिपोर्ट नॉर्मल असूनही सतत शारिरिक त्रास होणे. २४) आपल्याला काहीतरी गंभीर आजार असेल किंवा होईल याची भिती वाटणे. २५) झोपेच्या समस्या, सतत चिंता काळजी, जुनाट डोकेदुखी, दातखिळी बसणे. २६) असंबंध बडबड, भिती संशय, भास होणे. २७) लहान मुलांच्या समस्या : अभ्यासात लक्ष नसणे, हट्टीपणा, अतिचंचलता, झोपेत लघवी होणे, मतिमंद मुलांच्या वर्तणुकीच्या समस्या. २८) व्यसनांच्या समस्या : दारु, सिगारेट, तंबाखू, गुटखा, मावा, इ.२९) व्यसनमुक्ती/ नशामुक्ती वरील उपचार साठी डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



## पान ६ वरून...

### अतिवृष्टीने बाधित सरसकट

धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या बैठकीस युवक नेते तथा माजी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, ऍड गोविंदराव फड, मार्केट कमीटीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, माऊली तात्या गडदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, प्रा मधुकर आघाव, राजाभाऊ पोळ, माणिक भाऊ फड, पिंटू मुंडे, चंद्रकांत कराड, विष्णुपंत देशमुख यांसह मतदारसंघातील सर्व गट व गणप्रमुख त्याचबरोबर उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे, महावितरण चे कार्यकारी अभियंता श्री डाकरे व श्री चाटे, उप अभियंता अभिजित राठोड, परळीचे गटविकास अधिकारी संजय केंद्रे, अंबाजोगाई येथील गटविकास अधिकारी श्रीमती दिवाणे, यांसह महसूल, जिल्हा परिषद, आरोग्य, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम इत्यादी विभागाचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

--------------

### गुटखा बंदी तरी प्रशासकीय

खिडक्या व भिंती गुटख्याच्या थुंकीच्या डागांनी लालबुंद झालेले आहेत. व्यसनमुक्तीचे संदेश देणारे अधिकारीच आपल्या कार्यालयाच्या भिंती गुटख्याच्या रंगांनी रंगवत आहेत, ही दुहेरी भूमिका नागरिकांच्या पोटात आग आणणारी आहे. खाद्य सुरक्षा व मानदंड कायदा २००६ नुसार गुटखा विक्री हा गुन्हा आहे. सर्वोच्च न्यायालयाने व उच्च न्यायालयाने बंदीला दुजोरा दिला आहे. तरीही अंमलबजावणी करणारा अन्न भेसळ विभाग 'बघ्याच्या' भूमिकेत आहे. पकडलेला गुटखा जप्त होतो खरी, पण त्याचा नाश नेमका कसा व कुठे केला जातो याचा पारदर्शक अहवाल आजवर जनतेसमोर आलेला नाही.गुटखा माफियांना स्थानिक राजकीय छत्रछाया व प्रशासनातल्या काही भ्रष्ट लोकांच्या जवळीक असल्याशिवाय गुटखा बाजारात मोकाट फिरूच शकत नाही. व्यसनमुक्तीची भाषणे देणारेच अधिकारी आपल्या दाराजवळ गुटखा थुंकून लोकांच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. ही परिस्थिती म्हणजे शासनाच्या आदेशाला व न्यायालयीन निर्णयांना सरळसरळ आव्हान आहे.

---------------

### भीषण अपघातानंतर

पवार यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना त्वरित मदतकार्य सुरू करण्याचे आदेश दिले असून शासनाच्या माध्यमातून मृतांच्या कुटुंबियांना तातडीची आर्थिक मदत मिळवून देण्यात येणार आहे. डॉ.क्षीरसागर यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांशी चर्चा करून आरोग्य विभागामार्फत संपूर्ण अहवाल शासनाकडे पाठवण्याच्या सूचना दिल्या. यावेळी सरपंच गणेश खांडे, नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, दत्ता जाधव यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, या अपघातात आकाश कोळसे, दिनेश पवार, किशोर तौर, (सर्व रा.बीड), अनिकेत शिंदे, पवन जगताप, विशाल काकडे (सर्व रा.शिदोड) यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेबद्दल हळहळ व्यक्त करताना रस्त्यावरून पायी प्रवास करताना सर्वांनी सतर्क राहावे, मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांसोबत मी ठामपणे उभा आहे, असे आश्वासन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले.

--------------

### माजलगाव धरणाचे सात

आले आहेत.तर दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास आणखी दोन अशा एकूण सात गेटद्वारे सिंधफना नदी पात्रात १३९८९ क्युसीसने पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. मागच्या १० वर्षात माजलगाव धरण सहाव्यांदा भरल्याची घटना आहे.२०१८-१९ मध्ये धरण मृत साठ्यात होते.तर २०१९-२० मध्ये १००%,२०२०-२१ मध्ये शंभर टक्के, २०२१-२२ १००%,२०२३- २४ मृत साठ्यात तर पुन्हा सहाव्यांदा २०२५-२६ मध्ये माजलगाव धरण सहाव्यांदा शंभर टक्के भरले आहे. दरम्यान पाणलोट क्षेत्रातून माजलगाव धरणात येणाऱ्या पाण्याची आवक १७,८२३ क्युसेस आहे.एकूण उपयुक्त पाणीसाठा ९७% असल्याची माहिती माजलगाव धरण अभियंता परिमल सोनवणे, शाखा अभियंता गणेश झापुगडे,यांनी दिली आहे.

------------

### शिरूर तालुक्यातील विवाहितेचा

भगवान राऊत यांच्याकडून गेल्या वर्षभरापासून केली जात होती. करिष्मा माहेराहून पैसे आणत नाही म्हणून या चौघांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. या छळाला कंटाळून करिष्मा सचिन सांगळे या विवाहितेने आपल्या अडीच वर्षाच्या चिमुकलीची परवा न करता बुधवार दि. २७ ऑगस्टच्या पहाटे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सदरील घटना घरच्या लोकांच्या लक्षात आल्यानंतर तिला रायमोह येथे उपचारासाठी हलवण्यात आले होते. रायमोह येथे उपचार न मिळाल्याने पुढील उपचारासाठी बीड कडे हलवण्यात आले मात्र उपचारादरम्यान करिष्मा सांगळे या विवाहितेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवार दि. २८ ऑगस्ट रोजी पहाटे घडली आहे. मयत करिष्माचे वडिल शिवदत्त विठ्ठल पंडित यांच्या फिर्यादीवरून आरोपी पती सचिन नवनाथ सांगळे, सासू अरुणा नवनाथ सांगळे, मामे सासरा भगवान रामभाऊ राऊत , मामेभाऊ तुकाराम भगवान यांच्याविरुद्ध हुंड्याच्या मागणीसाठी आत्महत्येस प्रवृत्त केल्या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला आहे. आरोपी सासू अरुणा सांगळे यांना पोलिसांनी अटक केली असून सचिन सांगळेसह भगवान राऊत, तुकाराम राऊत हे आरोपी अद्याप फरार आहेत.

## पान १ वरून...

### सात वर्षांनंतर

अतिरिक्त २५ टक्के शुल्क लावले, यामुळे अमेरिकने टॅरिफ ५० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. आता पंतप्रधान मोदींचा हा दौरा अमेरिकेच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर होत आहे.

------------

### १५ ऑक्टोबरपासून कापूस

तसे पैसे कपात होतात. त्यानुसार ८ ते १२ टक्के ओलावा गृहित धरुन ३२४ रुपये कपात होतात. परंतु ओलाव्याची मर्यादा १५ टक्के करावी, अशी मागणी आहे. त्यानुसार वाढीव ओलाव्यासाठी तीन टक्क्यांचे ५६७ रुपये अतिरिक्त कपात होतील, परंतु कापूस विकण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना फायदा होईल, असे सांगितले जात आहे.

------------

### ५० टक्क्यांची मर्यादा

महाराष्ट्राचाच नाही, तर देशातील इतर राज्यांचाही आहे. त्यामुळे सर्व संबंधित राज्यांशी चर्चा करून संसदेमध्ये ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. यासाठी मी स्वत: काही सहकाऱ्यांशी बोलणी केली आहे,' असे पवार म्हणाले. शेतकरी व सैन्यात कार्यरत असलेल्या समाजघटकांसमोर हा प्रश्न गंभीरपणे उभा आहे. संसदेत जर याबाबत निर्णय घ्यायचा असेल, तर केंद्र सरकारची स्वच्छ व न्यायाची भूमिका असली पाहिजे. तसे झाल्यास आरक्षणाचा प्रश्न निश्चित सुटेल, असा ठाम विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

----------

### मनोज जरांगे मागण्यांवर ठाम

गॅझेटसाठी वेळ द्यायला तयार आहोत. मराठवाड्यातील सारे मराठा कुणबी ठरवा. मंत्रिमंडळाने उद्याच बैठक घ्यावी, सरकार, मंत्रिमंडळ, राज्यपाल सगळेच आहेत. १० मिनिटांत गॅझेट लागू होईल असं जरांगेंनी न्या. शिंदे यांच्याकडे मागणी केली. या चर्चेत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर सरकारने काढावा. संभाजीनगरला १९३० साली १ लाख २३ हजार कुणबी होते. मराठवाड्यातील ९० वर्षापूर्वीचे कुणबी आता गेले कुठे? जालन्यात ९७ हजार कुणबी होते. कुणब्यांच्या प्रत्येक घरात पाच पाच मुलं गृहित धरा. सरकारने आता जास्त वेळ घेऊ नये. तुम्ही आमच्या जीविताशी खेळताय. आता एक मिनिटही सरकारला वेळ देणार नाही. शिंदे समितीला चर्चेला पाठवणे म्हणजे विधानसभा, विधान परिषदेचा अपमान आहे. विधिमंडळ कायदे मंडळाचा अपमान करण्याचं काम देवेंद्र फडणवीस करत आहेत असा आरोप त्यांनी केला.जरांगेंनी मांडलेले मुद्दे मंत्रिमंडळासमोर ठेवले जातील. हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाचा आहे. तो माझा नाही. त्यामुळे मी सध्या यावर बोलणार नाही. जे काही मुद्दे चर्चेत आले त्याबाबत उपसमितीच्या अध्यक्षांना कळवणार आहे असे जरांगेसोबत चर्चा करण्यासाठी आलेल्या न्या. शिंदे यांनी म्हटले.दरम्यान, आम्हाला ६ महिन्याचा वेळ द्या अशी समितीची मागणी होते. प्रक्रियेसाठी वेळ लागेल तो द्यावा. सरसकट संपूर्ण समाजाला प्रमाणपत्र देता येणार नाही असे शिंदे समितीचे चर्चेत सांगितले. तर मागासवर्गीय आयोग सोडून इतर कुठल्याही मागणीसाठी वेळ देणार नाही अशी भूमिका जरांगे यांनी घेतली. पुढच्या शनिवारी, रविवारी एकही मराठा घरात दिसणार नाही. मराठवाड्यातील सर्व मराठा समाज कुणबी असून त्यांना उद्यापासून प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात करा. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्यांच्या वारसांना सरकारी नोकरी आणि १० लाखांची मदत द्यावी. ५८ लाख नोंदीचा आधार घेत मराठा कुणबी एकच असल्याच जीआर काढा, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

-----------

### बीडजवळ भीषण अपघात,कंटेनरने

सहाही जणांना चिरडले. यात चौघांचा जागीच तर दोघांचा उपचारदरम्यान मृत्यू झाला. कंटेनरच्या दोन चालकांना बीड ग्रामीण पोलीस ठाण्यातील सहाय्यक निरीक्षक बाळराजे दराडे, प्रसाद कदम यांच्यासह महामार्ग पोलीस गजानन जाधव, बालाजी ढगारे, तात्या बांगर, सदगर यांनी ताब्यात घेतले. अपघातातील मृतदेह जिल्हा रुग्णालयात असून या घटनेने जिल्हा हळहळला आहे. महामार्गाला सर्विसरोड नसल्यामुळे असे अपघात सातत्याने होत आहेत.

------------

### ९ सप्टेंबर पर्यंत पगार न दिल्यास

व्यक्त करत पगार बिल जमा करून तातडीने वेतन करण्याची मागणी केली. बेकायदेशीरपणे पगार रोखल्याने आंदोलनात मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. याप्रसंगी शरद गिरमकर, ईश्वर आव्हाड, अशोक शिंदे, राधिका महांकाळ, अकबर खान, भगवान बडगुजर, मदन दुबे, रवी कांबळे, गवरे सर, भामरे सर, पाखरे सर आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

---------

### मराठ्यांना झुलवायचे ओबीसींना डीएनए म्हणायचे

त्यामुळे आता सरकारचीही मोठी कोंढी झाली हे दिसत असताना सरकार मात्र यातून पळवाटा काढत आहे. प्रारंभी सरकारने पुढे होणाऱ्या विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकीसाठी आंदोलनाचीच खेळी मत विभाजनासाठी वापरली हे आंदोलन कंट्रोल करण्यासाठी पोलीस यंत्रणा आणि माध्यमाचा सरकारनेच वापर केला आणि त्याचे राजकीय रूपांतर भाजपने आपल्या फायद्यासाठी वळवले. भाजपने हे आंदोलन सुरू असताना ओबीसी आमचा डीएनए आहे, अशी टॅगलाईन देऊन टाकली. मुंडे, भुजबळ, पडळकर, प्राध्यापक लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, मंगेश ससाने यांच्यासारखे चेहरे जाणीवपूर्वक पुढे केले. म्हणजेच मराठा आंदोलनाची भीती दाखवून ओबीसींना एकत्र करत ही वोट बँक स्थिर ठेवली नाही तर ती भाजपच्या बाजूने झुकवली गेली. राजकारणात मराठा समाजाचे वर्चस्व अधिक आहे मग त्या नेत्यांना त्यांचा इतिहास उकरून काढायला लावला. मग त्यांनी आरक्षण का दिले नाही हा मुद्दा पुढे रेटला गेला. देवबाप्पा, हे आंदोलन सामाजिक आणि भविष्यासाठी असले तरी त्याचा राजकीय फायदा राजकीय नेते कसे घेतात हे तुम्ही डोळ्यांनी पाहिले. आम्ही फक्त सांगत आहोत. आंदोलनानंतर मराठा आंदोलकाची ओबीसींना भीती दाखवण्याचे काम करून त्यांना एकत्रित केले आणि ते एक गठ्ठा मतदान भाजपने आपल्या पारड्यात पाडून घेतले. एकीकडे ओबीसी सुरक्षित नसताना मराठा समाजाला आरक्षण हाच एकमेव पर्याय पुढे ठेवला. त्यामुळे उर्वरित अडीअडचणी, विकास याकडे दुर्लक्ष होत गेले. मराठा समाज ओबीसीतून आरक्षण मागतोय हेच ओबीसींना सांगून तुमच्या आरक्षण संपत आहे त्यामुळे त्यांना एकत्रित केले गेले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये मराठा उमेदवाराला नैसर्गिक ३० टक्के मते नातलग, पारंपारिक मतदान प्लस भाजपाचे ट्रान्सफर झालेले मतदार पण निर्णय ७० टक्के ओबीसीचे मते हे आरक्षण धोक्यात आहे या भीतीमुळे एकवटली गेली. भाजपला त्याचा निवडणूक जिंकण्याचा फायदा झाला हे सत्य नाकारता येत नाही. आता सध्याच्या परिस्थितीमध्ये जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आहेत या निवडणुकीमध्ये पुन्हा मराठा आंदोलन सुरू झाले आहे. या आंदोलनाच्या भीतीचा वापर करून ओबीसी मते पुन्हा आपल्याकडे कसे घेता येतील हीच कन्सेप्ट पुन्हा एकदा सरकारकडून विशेषतः भाजपाकडून सुरू झाली आहे. त्यामुळे मराठा समाजाचा रोष ओबीसींची असुरक्षितता आणि सत्ता वापरून मीडिया शासकीय यंत्रणेचे खेळवणं हे सगळे जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये दिसूनच येईल. म्हणजेच देवबाप्पा थोडक्यात सांगायचे म्हणजे भाजपाची जी पद्धत आहे, ती मराठा आंदोलनाची भीती. ओबीसींना सुरक्षेचे कवच तयार करणे, माध्यम आणि प्रशासन यांचा राजकीय हत्यार म्हणून वापर करून, सत्ता काबीज करण्याचा हा शासनाचा आणि भाजपाचा प्रयत्न असल्याचे दिसत आहे. तेव्हा देवबाप्पा, तुम्हीच आता या सरकारला आणि समाजाला बुद्धी द्या. आरक्षणाच्या नावाने मराठा समाजाला झुलवत ठेवायचे आणि दुसरीकडे वोट बँकेसाठी ओबीसी आमचा डीएनए आहे, म्हणायचे. ही पद्धत आता बदलली पाहिजे आणि हे जनतेनेही आता लक्षात घेतले पाहिजे.

----------

### जरांगे मुंबईत का आले हे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना सवाल केला आहे. राज ठाकरे म्हणाले, ''जरांगे इथे का आले हे एकनाथ शिंदेंना विचारावे. नवी मुंबई येथे ज्यावेळी जरांगे आले होते तेव्हा शिंदे तिकडे गेले होते. त्यानंतर जरांगे यांनी आंदोलन मागे घेतले होते. परंतू आज पुन्हा त्यांच्यावर ही वेळ का आली, हे शिंदेंनाच विचारावे, असे ते म्हणाले. दरम्यान, मराठा आरक्षण उपसमितीची शनिवारी बैठक पार पडली. बैठकीत सर्व मुद्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. ''मराठा आरक्षण संदर्भात उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सरकार सकारात्मक आहे. जरांगे यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी आम्ही तयार आहोत, असे विखे पाटील म्हणाले.

----------

राज्य
लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ३१ ऑगस्ट २०२५


## थोडक्यात...



### गणेशोत्सव अनुषंगाने रूट मार्च व दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

पाटोदा । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन पाटोदा दिनांक ३० ८ २०२५ रोजी पोलीस स्टेशन पाटोदा येथील प्रॉपर पाटोदा शहरांमध्ये सध्या चालू असलेल्या गणेशोत्सव अनुषंगाने रूट मार्च व दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. रंगीत तालीम दरम्यान अश्रू धुरांचे दोन ग्रेनेड व दोन सेल तसेच दोन स्टन ग्रेनेड व दोन स्टन सेलचा वापर करण्यात आला.सदरची कारवाई करिता पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी तागड.. भगवान भाबड.. शैलेश पवार व पोलीस अंमलदार व होमगार्ड हजर होते

### विजय शेकडे यांनी दाखवले सर्वधर्मसमभावाचे दर्शन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील उदंरखेल येथे युवा नेतृत्व करणारे विजय शेकडे हे ओबीसी प्रवर्गात असुन देखील त्यांनी सर्वधर्मसमभाव व माणुसकीचा वसा जपत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे यांच्या चलो मुंबई या मोहिमेत सकल मराठा समाज यांना पाणी बॉटल व अन्नदान केले. सध्या महाराष्ट्रात मराठा ओबीसी हा एक प्रामुख्याने तिढा असुन सुद्धा एखादा युवक असे कार्य करतोय जे जातीपातीच्या भिंती तोंडुन अन्? सर्व धर्म समभाव या हेतूने जणू कौतुकास्पद आहे.... अन्? यांच्या कार्यामुळे त्यांचे सर्व राजकीय तथा सामाजिक स्थरातुन अन् पंचक्रोशीतुन तोंड भरुन कौतुक होतं आहे .

# कृषीकुलच्या माहिती गाडीचे जलनायक मयंक गांधी यांच्या उपस्थितीत लोकार्पण

## शेतीत परिवर्तन घडवण्यासाठी माहितीची नांदी; कृषीकुलची फिरती गाडी आता गावोगावी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेली कृषीकुल ही सामाजिक संस्था शेतकऱ्यांसाठी कार्यरत असून, राज्यभरातील हजारो शेतकरी येथे फळबाग लागवडीचे प्रशिक्षण घेऊन यशस्वी शेती करू लागले आहेत. टाटा सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आलेल्या परीक्षण अहवालानुसार शेतकऱ्यांच्या उत्पन्नात पूर्वीपेक्षा जवळपास दहा पटींनी वाढ झालेली दिसून येते. आणखी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कृषिकुल संदर्भातील माहिती व्हावी व त्यांना फळबाग लागवडीचे प्रशिक्षण मिळावे असा संस्थेचा प्रामाणिक आणि शुद्ध हेतु आहे. कृषिकुल बद्दलच्या सामाजिक कामांची संपूर्ण माहिती फिरत्या मोबाईल गाडीद्वारे शेकऱ्यांपर्यंत पोचवली जाणार असून



या गाडीचे शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी जलनायक मयंक गांधी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. कृषीकुल (सिरसाळा) येथे हा लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सौ.मिनल गांधी, शाम पंम्मी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

कृषिकुल ही सामाजिक संस्था शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देऊन शाश्वत शेतीसाठी प्रोत्साहित करते. आजपर्यंत महाराष्ट्रातील जवळपास २८ हजार शेतकरी कुटुंब संस्थेशी जोडले गेले आहेत. हजारो शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीचा मार्ग स्विकारल्याने जवळपास ६.५ कोटीपेक्षा जास्त फळझाडांची लागवड झाली आहे. यामुळे पर्यावरण संवर्धन होत असून शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीपेक्षा दहा पटीने जास्त उत्पन्न मिळत आहे. सिरसाळा येथील कृषिकुल हे जागतिक दर्जाचे शेतकरी प्रशिक्षण केंद्र असून, शेतकऱ्यांसाठी निवासी प्रशिक्षण घेण्यासाठी उत्तम दर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. नेहमीच संकटाचा सामना करणारा बळीराजा सुखावला जावा, त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी कृषिकुल कार्यरत असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कृषिकुल येथे यावे व शाश्वत शेतीचे प्रशिक्षण घेऊन आपले जीवन समृद्ध बनवावे असे आवाहन कृषिकुलच्या वतीने करण्यात आले आहे. शनिवारी लोकार्पण करण्यात आलेली गाडी ग्रामीण भागांतील गावोगावी जाऊन शेतकऱ्यांपर्यंत कृषीकुलची माहिती पोचवणार आहे. व्हिडिओ / ऑडिओ (दृकश्राव्य) साधनांचा वापर करून मोठ्या पडद्यावर शेतकऱ्यांना माहिती दिली जाणार असल्याचे कृषिकुलच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय - प्राचार्य अन्वर शेख




माजलगाव । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे, असा प्रेरणादायी संदेश बीड सहोदया स्कूल्स कॉम्प्लेक्स चे अध्यक्ष तथा सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख यांनी माउंट लिटरा झी स्कूलच्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ शपथविधी समारंभात दिला. त्यांनी नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे तर इतरांसाठी आदर्श निर्माण करणे होय, असेही म्हटले.

२०२५-२६ शैक्षणिक वर्षाचा हा महत्त्वाचा समारंभ शाळेच्या प्रांगणात अतिशय उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा परिषदेचे गटनेते अजय मुंडे तसेच परळी तहसीलचे माजी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांची उपस्थिती होती. प्राचार्य अन्वर शेख यांनी आपल्या मार्गदर्शक भाषणात विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत नेतृत्व, जबाबदारी व समाजसेवा या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी जीवनात प्रामाणिकपणा, शिस्त, वेळेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी यांवर विशेष भर देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. मान्यवरांनी सांगितले की खरे नेते ते असतात जे इतरांसाठी उदाहरण ठरतात आणि त्यांच्या कृतींतून प्रेरणा देतात. शाळेच्या मतदानाद्वारे निवडले गेलेल्या कॅप्टन, हेड बॉय, हेड गर्ल व विविध हाऊस लीडर्सचा गौरव सत्कार करण्यात आला. या विद्यार्थ्यांनी देशभक्ती व नेतृत्वाची शपथ घेऊन शाळेच्या शिस्त व कार्यक्षमतेचे पालन करण्याचे आश्वासन दिले. शपथविधी संपन्न झाल्यानंतर या पदाधिकाऱ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रम शाळेचे अध्यक्ष डॉ. हरीशचंद्र वंगे दादा, उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे आणि प्राचार्य मंगेश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य जल्लोषात साजरा करण्यात आला. पाहुण्यांच्या स्वागतानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रार्थना, स्वागत गीत व देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रम प्राचार्य मंगेश काशीद यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरळीत पार पडला.

या शपथविधी समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव व संघभावना जागृत झाली आहे. पालक व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमांचे व विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे कौतुक केले. या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ शपथविधी समारंभ सोहळ्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना संघर्षातून प्रगतीच्या दिशेने आणखी एक मोलाचे पाऊल टाकताना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

### सीए गोविंद कदम यांचे सेट परीक्षेत यश

बीड । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत जून महिन्यात घेण्यात आलेल्या सीईटी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत बीड जिल्ह्याचे सुपुत्र सीए गोविंद त्र्यंबकराव कदम यांनी वाणिज्य विषयात उत्तीर्ण होत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतूक होत आहे.

सध्या सीए गोविंद कदम हे बीड, माजलगाव आणि गेवराई या ठिकाणी प्रॅक्टिसिंग चार्टर्ड अकाउंटंट म्हणून कार्यरत आहेत. विद्यार्थीदशेपासून परिश्रम, चिकाटी आणि मार्गदर्शनाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले.



**बीड : भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरपालिकेचे माजी सभापती नवनाथ शिराळे यांची निवड झाल्याबद्दल शहरातील संभाजी महाराज क्रीडांगण येथे सर्व मित्रांनी सत्कार केला. यावेळी कल्याण रावजी वाघमारे, रामनाथ डाके, भानुदास कंठाळे बाळासाहेब गावडे, किसन वळेकर, शिवाजीराव पवार, गायकवाड , वराड, माणिकराव वेदपाठक, मसुरे, योगेश नाकाडे आदी यावेळी उपस्थित होते.**

## महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील,संस्कार शिक्षण मंडळ वडवणी,संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये दि.२९ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम यांच्या हस्ते पूजन करून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून क्रीडा शिक्षक हरिभाऊ निवरकर सर, क्रीडा शिक्षिका श्रीमती दिवे मॅडम अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. वडवणी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्रथम आलेली कु.वरवडे समृद्धी,चि.शुभम टिपरे,चि.शुभंकर



शेळके,चि.दीप निवरकर,चि.साई टिपरे,चि.दीप पंतगे या विजेत्या खेळाडू विद्यार्थ्यांचा क्रीडा दिनी मान्यवरांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून अभिनंदन करण्यात आले व जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या तसेच त्यांचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक निवरकर सर व क्रीडा शिक्षिका दिवे मॅडम यांचे अभिनंदन करण्यात आले.

विद्यालयाचे क्रीडा शिक्षक हरिभाऊ निवरकर सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की,हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांनी ऑलम्पिक हॉकी स्पर्धेमध्ये भारत देशाला सुवर्णपदक मिळवून दिले त्यांचा जन्मदिवस संपूर्ण भारत देशामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्या म्हणाल्या की,राष्ट्रीय क्रीडा दिन विद्यालयामध्ये साजरा करण्याचा मुख्य उद्देश खेळाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी,खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहते असे बोलून सर्वांना राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व उपस्थितांचे आभार क्रीडाशिक्षिका श्रीमती दिवे मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## दिंद्रुड येथील माध्यमिक विद्यालयाचा तालुकास्तरीय बुध्दीबळ व कुस्ती स्पर्धेत डंका

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

तालुका स्तरीय बुद्धीबळ स्पर्धा माजलगाव येथे सुंदरराव सोळंके महाविद्यालय पार पडल्या. या स्पर्धेत माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालकांनी स्वागत केले असून त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सदरील स्पर्धेत बुद्धिबळ खेळात १९ वर्ष वयोगटात कु .श्रुती वर्षा अंधारे हिची तालुका स्तरीय स्पर्धेत निवड होऊन जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी ती पात्र झाली. कुस्ती स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात ३५ किलोखालील वजन गटात देवकर सार्थक महादेव,१७ वयोगटात ४८ वजन किलो गटात चि.बंडगर आकाश, ६५ किलो वजन



गटाखालील कु. साक्षी संतोष केकान, १९ वर्ष वयोगटात फ्री स्टाईल मध्ये ५७ किलो वजन गटात खांडेकर सुरेश अशोक, तर ७९ वजन गटात खालील शेख आयान ५७ किलो वजन गटात ग्रीक रोमन मध्ये चि.तंबुड ज्ञानेश्वर धर्मराज, या सर्व विद्यार्थ्यांचे तालुका स्तरावर निवड होऊन जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव रांजवण, सचिव प्रतापराव रांजवण, प्राचार्य जी.व्ही. उजगरे ,पर्यवेक्षक पी.जी.लखमावाड, जेष्ठ शिक्षक के.बी. भोसले, क्रिडा विभाग प्रमुख भुसारे एम. टी., क्रिडा शिक्षक तथा पत्रकार कटारे डी. व्ही. , जेष्ठ शिक्षक एस.एस. बारवकर, डावकर बी.व्ही, रायकर डी.पी., गव्हाणे आर.आर., शिंदे, निरडे, थावरे ए.सी., नाईकनवरे ए.एस., पवार डी.टी,. कोटुळे एस.पी. , कटारे एस.ए.,वाघमारे एस. डब्लू.,बोचरे व्ही.एस., सोनवणे एन.जे.,कदम एन. यू., रुपनर एम. आर., मंत्री आर., ठोंबरे एस. जी.,जमदाडे आर.डी., श्रीमती पवार ए.ई., कंधारे ए.टी. व सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.



## बीडमध्ये आ.अमित गोरखे यांचा अभूतपूर्व सत्कार

बीड । प्रतिनिधी

मातंग समाजभूषण तथा विधानपरिषद सदस्य आ. अमितजी गोरखे यांचे बीड शहरात प्रथम आगमन झाल्याने त्यांचा अभूतपूर्व सत्कार करण्यात आला. आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद (दादा) हातागळे यांच्या संकल्पनेतून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात हा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला.

आ. गोरखे यांनी प्रथम अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर दणदणीत स्वागताच्या गजरात त्यांचा १०० किलो वजनाचा हार क्रेनच्या सहाय्याने अर्पण करून सत्कार करण्यात आला. हा अनोखा सोहळा शहरवासीयांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.गेल्या तीस वर्षांनंतर मातंग समाजाला समाजाशी जिव्हाळा, प्रेम आणि ठामपणे आवाज उठवणारे नेतृत्व मिळाल्याचा अभिमान या वेळी व्यक्त झाला.सत्कार समारंभास विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. शेवटी आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## राष्ट्रीय क्रीडादिनी तायक्कांदोपटूंचा शासनाकडून गौरव

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त पुण्यातील बालेवाडी येथे आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ३३१ पदकविजेत्यांना रोख पारितोषिकाने गौरविण्यात आले. यामध्ये बीड ची आंतरराष्ट्रीय तायक्कांदो खेळाडू कु. नयन अविनाश बारगजे हीचा सन्मान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते ५ लाख रुपये बक्षीसाची रक्कम देऊन करण्यात आला.**

पुण्यातील म्हाळुंगे, बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते रोख पारितोषिकाने तायक्कांदोपटूंचा गौरव करण्यात आला. यावेळी क्रीडा मंत्री ड. माणिकराव कोकाटे उपस्थितीत होते. उत्तराखंड येथे भारतीय ऑलिंपिक असोसिएशनद्वारा आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील



पदक विजेते खेळाडू आहेत. शासनातर्फे या १४ खेळाडूंना बक्षिसांची रक्कम ७५ लाख ७० हजार रुपये देण्यात आले. यामध्ये बीड जिल्ह्यातील एकमेव खेळाडू कु. नयन अविनाश बारगजे हीचा ५ लाख रुपये व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

**पदक विजेते खेळाडू –**

गौरव दत्तात्रय भट, मृणाली शशिकांत हरणेकर, नयन अविनाश बारगजे, अभिजीत सर्जेराव खोपडे, आयुष संदीप ओहळ, भारती रोहिदास मोरे, साक्षी सातेरी पाटील, शिवम ऋषिकेश भोसले, शिवानी लाला भिलारे, श्रेया नितीन जाधव, सिद्धी अतुल बेंडाळे, मनीषा सिद्धाराम गुट्टेदार, वंश प्रेमसिंग ठाकूर व वसुंधरा विनोदकुमार चेडे यांना सन्मानित करण्यात आले.सर्व खेळाडूंचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबईचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , जिल्हा अध्यक्ष नितीन कोटेचा , दिनकर चौरे, नीरज बोरसे , दुलीचंद मेश्राम, प्रवीण बोरसे, मिलिंद पठारे, सुभाष पाटील, व्यंकटेश कररा, अजित घारगे, सतीश खेमस्कर , प्रशिक्षक प्रविण सोनकुल , अमोल तोडनकर , रॉबीन मेनेझेस यांनी अभिनंदन केले. यामध्ये सुवर्णपदक विजेत्यांना ७ लाख रुपये ,रौप्यपदक विजेत्यांना ५, तर ब्राँझपदक विजेत्यांना प्रत्येकी ३ लाखांचे बक्षिस देण्यात आले.

# फुलसांगवी साठवण तलावाची पाणी पातळी अद्यापतरी तळालाच

## तलाव भरतीसाठी शेतकऱ्यांची वरून राजाला साकडे

शिरूर । प्रतिनिधी

मराठवाड्यासह महाराष्ट्रामध्ये गेल्या दहा -पंधरा दिवसापूर्वी धो -धो पाऊस बरसून सर्वत्र हाहाकार उडवून दिला आहे. जिल्ह्यातील यामुळे नव्हे तर मराठवाड्यातील छोटे मोठे तलाव ओव्हर फ्लो झाले आहेत. ओढे,नदी, नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत याला अपवाद म्हणावे की दुर्दैव प्रति वर्षाप्रमाणे याही फुलसांगवी साठवण तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मुबलक पाऊस न झाल्यामुळे या तलावाची पाणी पातळी अद्याप तरी तळालाच राहिल्याचे पहायला मिळत आहे. यावर्षी तरी हा तलाव पूर्ण क्षमतेने भरेल की, नाही ? अशी शंका



परिसरातील जनतेला सतावत आहे.दोन-तीन दिवसापासून वरून राजा पुन्हा सक्रिय झाला आहे यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या असून वरून राजा धो-धो बरस रे असे शेतकरी वरून राजाकडे साकडे घालत आहेत.

एकोणीस वर्षात एकदाच पूर्ण क्षमतेने तलाव भरला.

फुलसांगवी साठवण तलावाची निर्मिती झाल्यानंतर परिसरामध्ये हरितक्रांती येईल असे शेतकऱ्यांनी उरासी स्वप्न बाळगले होते. या साठवण तलावाचे प्रत्यक्ष काम सन २००६ साली पूर्णत्वास गेले. यानंतर हा तलाव एक दोन वर्षात पूर्ण भरेल आणि हा परिसर कायम स्वरूपी बागायती होईल असे प्रत्येकांना वाटत होते म्हणून फुलसांगवी परिसरातील शेतकऱ्यांनी आऊच्या बाऊ खर्च करून तलावापासून ते आपल्या शेतापर्यंत पाईपलाईन करून घेतल्या होत्या. तर काही शेतकऱ्यांनी तलावाच्या जवळ आपल्या शेतीला कायम स्वरूपी पाणी होईल यासाठी विहिरी देखील खोदल्या यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी देखील झाले मात्र दुर्दैव असे सन २००६ मध्ये निर्माण झालेल्या तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये दमदार पाऊस होत नसल्याने सन २०२१हे वर्ष अपवाद फुलसांगवी साठवण तलाव पुन्हा दुसऱ्यांदा पूर्ण क्षमतेने भरलाच नाही ही शेतकऱ्यांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

### पाणलोट क्षेत्रात पाझर तलावांची आडकाठी

फुलसांगवी साठवण तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये तांदळा गावचा पाझर तलाव, सैदापूरचा पाझर तलाव, फुलसांगवी येथील कहार ओढ्यावरील तलाव काजाळा येथील म्हसोबाचा तलाव असे चार पाझर तलाव व छोटे -मोठे परिसरामध्ये बंधारे बांधलेले आहेत पाझर तलाव व बंधारे जेव्हा ओव्हर फ्लो होतात तेंव्हाच फुलसांगवी साठवण तलावामध्ये पाणी वाहून येते. या चारही पाझर तलावाला दमदार पावसाची अद्याप तरी प्रतीक्षा असल्याने फुलसांगवी साठवण तलावामध्ये पाणी किती प्रमाणात याची शेतकऱ्यांना उत्कंठा लागली आहे.

### तलावाच्या सिंचनावरती होते हजारो एकर बागायती

कोरोना काळामध्ये सतत दोन वर्षे लॉकडाऊन राहिल्याने २०२० व २१ या दोन वर्षाच्या पाऊस काळामध्ये फुलसांगवी साठवण तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये भक्कम पाऊस झाला होता. यामुळे २०२० हा तलाव सुमारे ८०% टक्के तर २०२१मध्ये १००% भरला होता. यामुळे या तलावाच्या पाण्यावरती एक ते बाराशे एक्कर क्षेत्र ओलिता खाली येऊन बागायती झाले होते. मात्र तिसऱ्यावर्षी पाऊस कमी झाल्या मुळे बागायती क्षेत्रात मोठी घट झाली.

## युसूफवडगाव येथे गणेश मंडळाने केला ऑपरेशन सिंदुरचा देखावा

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील रामनगरीचा राजा सार्वजनिक गणेश मंडळाने यावर्षी भारतीय सैन्यांची यशोगाथा सांगणारा ऑपरेशन सिंदुरचा देशभक्तीचा देखावा तयार केला आहे.




सध्या सर्वत्र गणेश उत्सवाची धामधुम सुरु आहे त्यानुषंगाने गणेश मंडळे विविध विषयांवर देखावे सादर करत आहेत असेच युसूफवडगांव येथील रामनगरीचा राजा सार्वजनिक गणेश मंडळाने काही दिवसापुर्वी जम्मु-काश्मिर मधील पहलगाम येथे काही भारतीय पर्यटकांवर भ्याड हल्ला करून त्यांना मारण्यात आले होते.याला प्रत्युत्तर म्हणुन भारतीय सैन्याने अदम्य साहस दाखवत ऑपरेशन सिंदुर व्दारे त्यांच्याच घरात त्यांच्या जोरदार हव्या करून पहलगाम हल्ल्यात शहिद झालेल्या भारतीय पर्यटकांचा बदला घेतला होताच याच धर्तीवर ऑपरेशन सिंदुरचा देशभक्तीचा देखावा तयार करून भारतीय सैन्याने बद्दल या मंडळाने एक प्रकारे आपली कृतज्ञता व्यक्त केली असुन या देखाव्या बद्दल गावकरी या मंडळाचे कौतुक करत आहेत.

# जलसंधारण कामांच्या मान्यतेचे अधिकार कृषी विभागाकडून काढले

पुणे : पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतील जलसंधारण कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे कृषी खात्याचे अधिकार काढण्यात आले आहेत. तांत्रिक मान्यता यापुढे केवळ जलसंधारण अधिकारी देतील, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा पाणलोट कक्षाचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी कामकाज बघतात. त्यामुळे राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणेने बुधवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना या निर्णयाची माहिती दिली. 'कृषी सिंचन योजनेतून मृद व जलसंधारणाच्या क्षेत्र तसेच नाला उपचाराची कामे केली जातात.

परंतु, अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देताना विलंब होत असल्याचे निदर्शनास आले. ही कामे मार्च २०२६ पूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे फळबाग लागवड वगळता सर्व अंदाजपत्रकांना जिल्हा जलसंधारण अधिकारी मान्यता देतील,'' असे सूत्रांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे कृषी विभाग व जिल्हा परिषदेच्या जलसंधारण विभागासह सर्व यंत्रणांना परस्पर निर्णय घेता येणार नाही. ''शेतकऱ्यांना सल्ला देणे व योजनांचा विस्तार करण्याचे मुख्य काम कृषी विभागाचे आहे. मात्र, कृषी अधिकाऱ्यांनी जलसंधारणाची कामे अकारण ओढावून घेतली. राज्यात मृद व जलसंधारण विभाग स्वतंत्रपणे कार्यरत असताना कृषी विभागाने ही कामे करणे संयुक्तिक नव्हते,'' असे एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले. मृद व जलसंधारण कामांची अंदाजपत्रके तयार करताना दरसूची तसेच निविदा प्रक्रियादेखील यापुढे जलसंधारण विभागाकडील वापरण्यात यावी. परंतु, फळबाग लागवड तसेच भूजल यंत्रणेशी संलग्न कामे असल्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मान्यता घ्यावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे.




## कंदमाशीला आळा घालण्यासाठी करा हे उपाय



कंदमाशी : कंदमाशी ही हळद पिकावरील नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. कंदमाशीचा प्रौढ डासासारखा परंतु मुंगळ्याप्रमाणे आकाराने मोठा व काळसर रंगाचा असतो. प्रौढ माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायांची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यांच्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. ज्या ठिकाणी हळदीचे कंद उघडे पडलेले असतील त्या ठिकाणी जमिनीलगत प्रौढ माशी अंडी देते व अशा अंड्यातून अळ्या बाहेर पडून उघड्या गड्डयामध्ये शिरून त्यांच्यावर उपजीविका करतात. अशा गड्डयामध्ये नंतर बुरशीजन्य रोगांचा आणि काही सुत्रकृमींचा शिरकाव होतो. त्यामध्ये खोड व गुद्दे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात. जास्ती दिवस लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक प्रमाणात अनुकूल असतो. वेळीच लक्ष दिले नाही तर या कीडीमुळे हळद पिकामध्ये ४५ ते ५० टक्के नुकसान होते. ही कीड जुलै-ऑगस्ट ते पिकाच्या काढणीपर्यंत नुकसान करते.

व्यवस्थापनाचे उपाय : जुलै ते ऑक्टोंबर दरम्यान १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% टक्के २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० टक्के १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळून आलटुन-पालटून फवारावे. उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी. तसेच जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. याच पद्धतीने आळवणी एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात एकदा करावी. कंदमाशी मुळे कंद कूज झाली असल्यास मुख्य किटकनाशकासोबत एका बुरशीनाशकाची तज्ञांच्या सल्ल्याने मिसळून आळवणी करावी. त्याचबरोबर एकरी २-३ पसरट तोंडाची भांडी वापरून प्रत्येक भांड्यात एरंडीचे २०० ग्रॅम भरडलेले बी घेऊन त्यात १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होतात व त्यात पडून मरतात. हळद पीक काढल्यानंतर शेतात राहिलेल्या पिकांचे अवशेष, सडके कंद जमा करून नष्ट करावेत.

## सोयाबीन पिकावरील पाने खाणाऱ्या किडींचे व्यवस्थापन



सोयाबीनचे पिक मध्यस्थितीत फुलोऱ्याच्या तसेच शेंगा लागण्याच्या अवस्थेत आहे. या अवस्थेत सोयाबीन पिक हिरवेगार, मऊ, लुसलुशीत आणि दाट पानांचे असल्यामुळे अनेक पाने खाणाऱ्या किडी या पिकाकडे आकर्षित होतात. त्यात प्रामुख्याने तंबाखूवरील पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा), उंट अळी, पाने गुंडाळणारी अळी, केसाळ अळी व शेंगा पोखरणारी अळी (निकोव्हो वा पाने खाणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसुन येतो.

एकात्मिक कीड व्यवस्थापन : पिकाच्या सुरवातीच्या अवस्थेत पिक तणमुक्त ठेवावे. बांधावर असणाऱ्या किडीच्या पर्यायी यजमान वनस्पतीचा नाश करावा. मुख्य पिकाभोवती एरंडी आणि सूर्यफूल या सापळा पिकाची एक ओळ लावावी. त्यावर तंबाखूवरील पाने खाणारी अळी, उंट अळी व केसाळ अळीने प्रादुर्भावग्रस्त पाने आढळल्यास अशी पाने अळयांसहित नष्ट करावीत. उशिरा पेरणी केल्यास या किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आदळून येण्याची शक्यता असते.


यांत्रिक उपाय : शेतात अगदी सुरवातीला किड व रोगग्रस्त झाडे दिसताच उपटुन नष्ट करावीत. तंबाखूवरील पाने खाणारी अळी व केसाळ अळी एकाच पानावर कुंजक्याने अंडी घालते. त्यातुन बाहेर पडणाऱ्या अळ्या सुरवातीला एकाच पानावर बहुसंख्य असतात. अशी अंडी व अळीग्रस्त पाने अलगद तावुन किडींसह नष्ट करावीत. शेंगा पोखरणारी अळी व तंबाखूवरील पाने खाणारी अळी या किडीच्या प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी एका हेक्टरवर प्रत्येकी पाच कामगंध सापळे लावावेत.

जैविक उपाय : सुरवातीस निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अझाडिरॅक्टिन १००० पीपीएम २० ते ३० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. मेंटारालम रीलाई व विव्हरिया बँमियाना (१.१५ विद्राव्य पावडर) या बुरशीजन्य जैविक किटकनाशकाची ५० पैम प्रति १० लिटर सुरवातीला पाण्यात मिसळून फवारणी करावी. जॅसिलम थुरीजेन्सीस प्रजाती कुर्ताकी या विषाणूजन्य जैविक किटकनाशकाची १०-१५ ग्रॅम /मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तंबाखूवरील पाने खाणारी अळी (म्पोडोप्टेरा) व शेंगा पोखरणारी अळी (हेलिकोवर्पा) यांच्या व्यवस्थापनामाठी अनुक्रमे एम.एल.एन.पी.व्ही. (५०० एल.ई) व एच. ए. एन.पी.व्ही. (५०० एम.ई.) या विषाणुजन्य किटकनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिमळून फवारणी करावी. रासायनिक उपाय : पाने खाणाऱ्या किडींची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी. दूसरी फवारणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने करावी एकच किटकनाशक न वापरता ते आलटून पालटून वापरावे.

## पपईतील बोरॉनच्या कमतरतेमुळे उत्पादनात होऊ शकते घट; जाणून घ्या लक्षणे आणि व्यवस्थापन

पपई पिकामध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले व फळे तयार होण्यास अडथळा येतो. फुले फार लवकर कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. अशा परिस्थितीत, काही व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करून उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे दुष्परिणाम रोखता किंवा कमी करता येतात. बोरॉन हे पपई लागवडीतील एक महत्त्वाचे सूक्ष्म अन्नघटक आहे. कारण ते पेशींची निर्मिती आणि पुनरुत्पादन प्रक्रियांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईमध्ये विविध लक्षणे दिसू शकतात, ज्यामुळे पिकाच्या एकूण आरोग्यावर आणि फळ उत्पादनावर वाईट परिणाम होतो.

बोरॉनच्या कमतरतेची मुख्य लक्षणे : विकृत पाने – पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेच्या सुरुवातीच्या लक्षणांपैकी एक म्हणजे कोवळी पाने विकृत होणे हे आहे. झाडाची पाने ठिसूळ होऊन वर किंवा खालच्या दिशेने गुंडाळले जातात. पानांच्या शिरा जाड होतात. पानांचा आकार लहान होतो, ज्यामुळे पाने कडक आणि विकृत दिसू शकतात. पानांच्या शिराजवळचा भाग पिवळा पडणे – बोरॉनच्या कमतरतेमुळे पपईच्या पानांमध्ये इंटरवेनल क्लोरोसिस यासारखी लक्षणे दिसतात. यामुळे पानांवर डाग पडतात किंवा ती पिवळी दिसतात. विशेषतः कोवळ्या पानांवर ही लक्षणे दिसतात. झाडाची वाढ खुंटते – प्रादुर्भावीत झाडात पेशींचे विभाजन कमी झाल्यामुळे झाडांची वाढ खुंटते. कोंबाची वाढ होत नाही किंवा त्याची मर होते, ज्यामुळे झाडाची एकूण उंची आणि जोम कमी होतो. फुले आणि फळांची वाढ होत नाही – पपईमध्ये बोरॉनच्या कमतरतेमुळे फुले आणि फळांचा विकास थांबतो.



फुले अकाली कोमेजतात, ज्यामुळे फळांच्या उत्पादनात लक्षणीय घट होते. याव्यतिरिक्त, जे फळ तयार होतात ते विकृत असू शकतात, फळांना तडे जाऊ शकतात ज्यामुळे त्यांची गुणवत्ता ढासळून ते विक्रीयोग्य राहत नाही. मुख्य खोड तडकणे – बोरॉनची कमतरता असलेल्या पपईच्या झाडांमध्ये अनेकदा मुख्य खोडामध्ये भेगा किंवा फूट दिसून येते, जे मुख्यता चिक गळण्यामुळे होऊ शकते. यामुळे झाडे कमकुवत होतात आणि रोग आणि कीटकांच्या प्रादुर्भावास अधिक बळी पडतात.

बोरॉनची कमतरता भरून काढण्याचे उपाय : पपईतील बोरॉनच्या कमतरतेच्या व्यवस्थापनासाठी माती आणि पानांवर फवारणी तसेच माती आणि पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण करणे आवश्यक आहे. माती सुधारणा – पपईमध्ये बोरॉनची कमतरता दूर करण्यासाठी, बोरॅक्स (सोडियम बोरेट) किंवा सोल्युबर (सोडियम पेंटाबोरेट) सारखी बोरॉनयुक्त खते जमिनीतून देता येऊ शकतात. कमतरतेच्या तीव्रतेनुसार आणि मातीच्या प्रकारानुसार शिफारशीप्रमाणे साधारणतः १-२ किलो बोरॅक्स प्रति हेक्टर डोस द्यावे. बोरॅक्स हे जास्त प्रमाणात जमिनीत घालू नये, कारण ते विषारी होऊ शकते. पानांद्वारे फवारणी – बोरॉनच्या कमतरतेची लक्षणे लवकर भरून काढायची असल्यास पानांद्वारे फवारणी जास्त प्रभावी उपाय आहे. ०.२ ते ०.३% बोरॅक्स किंवा ०.१-०.२% सोल्युबरचे द्रावण झाडाची वाढ आणि पुनरुत्पादनाच्या अवस्थेत पानांवर फवारता येते. बोरॉनची पुरेशी पातळी राखण्यासाठी फुलधारणा आणि फळधारण अवस्थेत वारंवार फवारणी करणे गरजेचे असते. माती परीक्षण आणि खत व्यवस्थापन – बोरॉनची पातळी निश्चित करण्यासाठी आणि त्यानुसार खतांचा वापर समायोजित करण्यासाठी नियमितपणे माती परीक्षण करणे आवश्यक आहे. ७.० (अल्कलाईन) पेक्षा जास्त सामू असलेल्या मातीत बोरॉनची उपलब्धता कमी होते, त्यामुळे सेंद्रिय पदार्थ किंवा सल्फर सुधारकाद्वारे मातीचे सामू नियंत्रित केल्यास मातीद्वारे बोरॉनचे चांगले शोषण होऊ शकते. सेंद्रिय कर्ब वाढवणे – जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढल्याने बोरॉनची उपलब्धता वाढते. कंपोस्ट आणि चांगले कुजलेले खत केवळ बोरॉनचा पुरवठा करत नाही तर मातीची रचना, पाणी धरून ठेवण्याची क्षमता आणि पोषक द्रव्ये टिकवून ठेवतात. जे पपईच्या झाडाद्वारे चांगल्या प्रकारे शोषले जातात. पाणी व्यवस्थापन – जास्त सामू (पीएच) किंवा कार्बोनेटयुक्त सिंचन पाणी बोरॉनची उपलब्धता कमी करू शकते. संतुलित मात्रात खनिज असलेल्या पाण्याचा वापर करून योग्य पाणी व्यवस्थापन करणे, झाडाजवळ अतिरिक्त पाणी साचणे किंवा पाण्याचा ताण टाळणे या उपायामुळे बोरॉन शोषण्यास मदत होऊ शकते. याव्यतिरिक्त, ठिबक सिंचनमुळे, मातीत योग्य प्रमाणात आर्द्रता राखण्यास मदत होते. संतुलित खत – बोरॉनच्या कमतरतेसह इतर पोषक तत्वांचे, विशेषतः कॅल्शियम आणि पोटॅशियमचे असंतुलन होते. यासाठी झाडाला संतुलित खत दिले पाहिजे, ज्यामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांसह नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारख्या प्रमुख पोषक घटकांचा समावेश आहे, संपूर्ण झाडाच्या आरोग्यासाठी आणि वाढीस चालना देण्यासाठी हे आवश्यक आहे. वरील व्यवस्थापन धोरणांची अंमलबजावणी करून, पपई उत्पादक बोरॉनच्या कमतरतेचे परिणाम टाळू शकतात आणि कमी करू शकतात, निरोगी रोपांची वाढ, फुल आणि फळांचा योग्य विकास आणि उच्च उत्पादन सुनिश्चित करू शकतात. पपई लागवडीमध्ये बोरॉनचे प्रमाण पुरेसे राखण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण आणि वेळेवर नियोजन महत्त्वाचे आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७४ : गुरू रामदास शिखांचे चौथे गुरू बनले.
१६५९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपला मोठा भाऊ दारा शिकोह यांना फाशी दिली.
१८३५ : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची स्थापना झाली.
१८३५ : अमेरिकेतील ह्युस्टन शहराची स्थापना झाली.
१९२८ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय स्वातंत्र्य लीग ची स्थापन करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश सैन्याने हाँगकाँगची जपानच्या अधिपत्यातुन सुटका केली.
१९७९ : सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी ऊर्जा निर्माण करुन 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' हा धूमकेतू सूर्याच्या पृष्ठबागावर आदळला. सूर्याच्या पृष्ठभागावर धूमकेतू आदळण्याची मानवी इतिहासातील ही पहिली नोंद आहे.
१९८४ : अमेरिकन अंतराळ यान डिस्कव्हरी ने पहिल्यांदा अवकाशात भरारी केली.
२००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने चंद्रयान-१ मोहीम ही औपचारिकरित्या समाप्त केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५९ : मुघल सम्राट अकबर यांचा मुलगा जहांगीर ४ यांचा जन्मदिन.
१५६९ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (मृत्यू: २८ आक्टोबर १६२७)
१७२० : व्हिटब्रेड हॉटेल्स चे संस्थापक सॅम्युअल व्हिटब्रेड यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७९६)
१८१२ : ब्यूएना विस्टा वाइनरी चे संस्थापक अगोगोस्टन हरसत्थी यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८६९)
१८१३ : ना. धों. ताम्हनकर लेखक, बालसाहित्यिक (मृत्यू: ५ जानेवारी १९६१)
१८५० : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (मृत्यू: १ सप्टेंबर १८९३)
१८७१ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ आक्टोबर १९३७)
१८८३ : जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ज्ञ, त्यांनी १९२४ मध्ये 'कैवल्यधाम' नावाची योगशिक्षणसंस्था स्थापन केली. संस्थेतील प्रयोगांची माहिती व्हावी यासाठी 'योगमीमांसा' नावाचे त्रैमासिक काढले. त्याचे ७ खंड प्रकाशित झाले आहेत. (मृत्यू: १८ एप्रिल १९६६ मुंबई)
१९०३ : भगवतीचरण वर्मा हिन्दी कथाकार, कादंबरीकार, कवी, एकांकिकाकार, पटकथाकार व नाटककार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित लेखक (मृत्यू: ५ आक्टबर १९८१)
१९०४ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९
१९२३ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' गीतकार (मृत्यू: १४ डिसेंबर १९६६)
१९३० : वॉरन बफे अमेरिकन उद्योगपती आणि दानशूर
१९३० : दशरथ पुजारी संगीतकार (मृत्यू: १३ एप्रिल २००८ डोंबिवली, मुंबई)
१९३४ : बाळू गुप्ते लेग स्पिन गोलंदाज (मृत्यू: ५ जुलै २००५)
१९३७ : मॅक्लारेन रेसिंग टीम चे संस्थापक ब्रुस मॅक्लारेन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९७०)
१९५४ : बेलारूस देशाचे पहिले अध्यक्ष अलेक्झांडर लुकासेंको यांचा जन्म.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी रवीशंकर प्रसाद यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७३ : सुमेर गार्दी याने नारायणराव पेशवे यांची शनिवारवाड्यात हत्या केली. (जन्म: १० ऑगस्ट १७५५)
१९४० : सर जे. जे. थॉमसन इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १८ डिसेंबर १८५६)
१९४७ : नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' त्यांची 'चाफा बोलेना, चाफा चालेना ' ही कविता खूप प्रसिद्ध आहे. (जन्म: १ जून १८७२)
१९५२ : भारतीय रिजर्व बँकेचे पहिले गव्हर्नर ओसबोर्न स्मिथ यांचे निधन.
१९८१ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (जन्म: ५ सप्टेंबर १९०७)
१९९४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (जन्म: ५ फेब्रुवारी १९१४)
१९९८ : नरहर वामन तथा 'नरुभाऊ' लिमये स्वातंत्र्यसैनिक, निर्भिड पत्रकार व काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते (जन्म: ८ नोव्हेंबर १९०९)
१९९९ चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९२१)
२००८ : प्रसिद्ध भरतीय उद्योगपती व बिर्ला कुटुंबातील सदस्य कृष्ण कुमार बिर्ला यांचे निधन.
२०१४ : भारतीय मार्क्सवादी इतिहासकार व आधुनिक भारतातील आर्थिक आणि राजकीय इतिहासातील तज्ज्ञ बिपीन चंद्र यांचे निधन. (जन्म: २७ मे १९२८)
२०१५ : भारतीय विद्वान लेखक एम. एम. कळबुर्गी यांचे निधन. (जन्म: २८ नोव्हेंबर १९३८)

cmyk

राज्य लोकतंत्र

# अहिल्यानगर/जालना







## थोडक्यात



### कालिंका स्टील गणेश मंडळात श्री गणेश मूर्तीची स्थापना

जालना : जालना शहरातील कालिंका स्टील गणेश मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भक्तिभावाने गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली. मंडळाच्या वतीने गणेश मूर्तीची स्थापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. गणपतीची आरती कालिंका स्टीलचे संचालक मा. घनश्यामजी गोयल यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांनी ''गणपती बाप्पा मोरया''च्या जयघोषात मंगलमय वातावरण निर्माण केले. या प्रसंगी अरुण शेठ अग्रवाल, अनुज बंसल, अनिल गोयल, यश गोयल, गोपाल सेठ गोयल, गोविंद गोयल, मनोज जिंदल व आदित्य जिंदल यांच्यासह प्रतिष्ठित मान्यवर मंडळी उपस्थित होती. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मंडळात भाविकांची गर्दी झाली असून, आकर्षक सजविण्यात आला आहे.

### ग्रामीण जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी बाबासाहेब कोलते यांची फेरनिवड



जालना : भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणीच्या जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी बाबासाहेब कचरु कोलते यांची सातव्यांदा निवड करण्यात आली आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनी एका पत्राद्वारे ही निवड केली आहे. या निवडीचे माजी केंद्रीय राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे, पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, माजी आ.कैलास गोरंटयाल,मा.आ.विलास बापु खरात, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे, सतिष घाडगे, रामेश्वर पाटील भांदरगे, अशोक पांगारकर, राजेश राऊत, बद्रीनाथ पठाडे, अनिलराव कोलते, गणेश बापू फुके, शिवाजीराव थोटे, देविदासराव कुचे, विमलताई आगलावे, संध्याताई देठे, विजय कामड, मुकेश चिने, पदमाकर जऱ्हाड, वसंतराव जगताप, भगवान मात्रे, विष्णु ठोंबरे, सुदाम बोचरे, दिलीप कोलते, विजय आहेर, सतिष जाधव, नामदेव तिडके, मनोज तोडावत, रामलाल चव्हाण, भाऊसाहेब भुजंग, मोहीनीराज मापारी, सांडू वाघ आदीसह भाजपच्या जालना ग्रामीण जिल्हयातील पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### मेजर ध्यानचंद यांची जयंती क्रीडा दिन म्हणून साजरी

जालना : अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे मेजर ध्यानचंद यांची जयंती क्रीडा दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी क्रीडा संचालक डॉ. भुजंगराव डावकर यांनी मेजर ध्यानचंद यांचे जीवन व कार्य यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी खेळातून खिलाडूवृत्ती जोपासत बौद्धिक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. पुढे बोलताना क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी खेळाला करिअरची संधी म्हणून बघावे असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, डॉ. कार्तिक गावंडे, डॉ. पंडित रानमाळ, डॉ. सीमा निकाळजे, प्रा. अविनाश भालेराव, डॉ. मसूद अन्सारी, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. बद्रीनाथ शिंदे, डॉ. अर्जुन जाधव, सुरेश चव्हाण, प्रा.चंद्रकांत लाटेकर, डॉ. शंकर तिकांडे, प्रा. दादासाहेब शिंदे यांची उपस्थिती होती.



**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती व्ही. व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १३२७/२०२५**

**ॲड. बी.एन. तावरे**

**संगिता भ्र. कचरु तावरे वि. निरंक**

अर्जदार १. संगित्ता भ्र. कचरु तावरे, वय-५१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आहेरवडगांव ता.जि. बीड, २. कचरु पि. कारभारी तावरे, वय-५७ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

विरुध्द गैरअर्जदार निरंक

प्रकरणः- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत सचिन पि. कचरु तावरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत सचिन पि. कचरु तावरे हे दिनांक ११/०५/२०२५ रोजी साई माऊली सुपरस्पेलिटी हॉस्पीटल, अहिल्यानगर येथे मयत झालेला आहे. अर्जदार क. १ ही मयताची असुन अर्जदार क. २ हे मयताचे वडील आहेत. मयत हा मृत्युसमयी अविवाहीत होता. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय संदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे सचिन पि. कचरु तावरे रा. आहेरवडगांव ता.जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख ०१/१०/२०२५.

आज दिनांक १९/०८/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

स्वाक्षरीत
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

# नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा-रिता मैत्रेवार

जालना । प्रतिनिधी

सर्वसामान्य जनतेच्या अडचणी तसेच तक्रारीचे निराकरण करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी जनसंवाद कार्यक्रमातंर्गत अंबड तालूक्यातील बठाण या गावाला भेट देवून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी श्रीमती मैत्रेवार यांनी भेटीत गावकऱ्यांच्या रस्ते, पाणी, वीज, रेशन, शिक्षण या मुलभूत अडचणी व समस्या जाणून घेतल्या. तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासंबंधी येणारे अडथळे, तसेच स्थानिक विकासाशी संबंधीत विविध मागण्याची माहितीही घेतली. यावेळी सरपंच भगवान इंगळे, मंडळ अधिकारी, केंद्र प्रमुख, तलाठी, कृषी सहायक ग्रामविकास अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार म्हणाल्या की, बठाण गावातील नागरिकांनी विकासाच्या कामाबाबत आपल्या संकल्पना शासनास सुचवाव्यात, त्यानूसार प्रशासनामार्फत कार्यवाही करण्यात येईल. जनसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्यक्ष समस्या सोडविण्याचा प्रयत्न



करण्यात येणार आहेत. ग्रामस्तरावरील विविध विभागांचे अधिकारी या कार्यक्रमात उपस्थित असून, प्रलंबित व अपेक्षित असलेली विविध कामे तात्काळ सोडविण्यासाठी जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्रीमती मैत्रेवार यांनी नागरिकांच्या तक्रारी व सूचना ऐकून तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश दिले. यावेळी शेत रस्ते विषयक प्रकरणे, स्वस्त धान्य दुकान, फेर-फार नोंदी, संजय गांधी निराधार अनुदान योजना, पांदण रस्ता, शिवरस्ता मोकळा करणे, घरकुल योजना, ई-पीक पाहणी, अंगणवाडी, आरोग्य सेवा आदी योजनांची विषयी बठाण ग्रामस्थांना माहिती देवून त्यांच्या अडचणीचे निराकरण जनसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच जागेवर सोडवणूक होणाऱ्या प्रकरणांचे निराकरण करण्यात आले.

तसेच तालुका, जिल्हा, विभागीय आणि शासन स्तरावरील प्रकरणे सोडवणूक करण्यासाठी संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आली. यावेळी बठाण येथील ग्रामस्थांनी गावाला जोडणारा मुख्य रस्ता करण्याची मागणी केली. तसेच नदीचे खोलीकरण करुन बंधाऱ्यावर गेट बसवून देणे, शाळेत शिक्षक उपलब्ध करुन देणे तसेच पर्यटन योजनेअंतर्गत गावातील मंदीराचा विकास करुन देण्याची मागणी केली. यावर श्रीमती मैत्रेवार यांनी संबंधीत विभागास याबाबत पाठपूरावा करुन सदर मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे सांगितले. या जनसंवाद कार्यक्रमासे नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## समाजाच्या जडण-घडणीत प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वापूर्ण -अनिल गोयल

### पत्रकारांच्या हस्ते अनोखा गणेश मंडळाची महाआरती

जालना । प्रतिनिधी

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बातम्या जनतेपर्यंत पोहोचवल्या जातात. पत्रकारांच्या व्यावसायिक जीवनात असलेल्या अनेक आव्हानांवर मात करून ते काम करतात. देश आणि समाजाच्या जडण-घडणीत प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. असे प्रतिपादन कालिका स्टील चे संचालक, उद्योजक अनिल गोयल यांनी केले.

प्रतीवर्षाप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील श्री. अनोखा गणेश मंडळाच्या बाप्पांची पत्रकारांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी उद्योजक अनिल गोयल बोलत होते. ऑल इंडिया स्टील



असोसिएशनचे अध्यक्ष योगेश मानधनी, मंडळाचे संस्थापक अजय (जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल (रूपम), पुरूषोत्तम भक्कड, राजकुमार दायमा (सरकार), गौरीशंकर देविदान, गणेश तिवारी, रोहित भुरेवाल, शाम भुरेवाल आदींची उपस्थिती होती. योगेश मानधनी याप्रसंगी म्हणाले, भारतीय संस्कृतीत सण, उत्सवांचे महत्त्व मोठ्या प्रमाणात असून आपल्या लेखणीद्वारे पत्रकार बांधव गणेशोत्सवात राबविण्यात येत असलेल्या सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी देऊन जनमाणसांत नवचैतन्य निर्माण करतात असे त्यांनी नमूद केले. जगदीश भरतिया यांनी ऊन, वारा, पाऊस, वादळ, अशा कोणत्याही परिस्थितीची परवा न करता दैनंदिन घटना, घडामोडी, जनतेपर्यंत पोहचवणाऱ्या पत्रकारांमुळे लोकशाहीचे अस्तित्व अधिक सशक्त आहे, असे जगदीश भरतिया यांनी सांगितले. यावेळी पत्रकार दिलीप पोहनेरकर, व्हॉइस ऑफ मीडिया संघटनेचे विकास बागडी, सुनील खरात, मिलिंद जोशी, शरद सोनटक्के, आशीष रसाळ यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## दिव्यांगांना अपमानिक करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करा

### शिवसेना दिव्यांग संघटनेची मागणी



जालना। प्रतिनिधी

दिव्यांगांना अपमानिक करून अपंग लंगड्या बांगड्या म्हणणाऱ्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करा शिवसेना दिव्यांगआघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल मगदुले व सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी

नुकत्याच झालेल्या लोकसभा विधानसभा निवडणुकीत राजकीय पुढाऱ्यांकडून दिव्यांगांना अपंग बहिऱ्या लंगड्या येड्या असे शब्द वापरण्यात आलेले आहे यामुळे दिव्यांकांचा घोर अपमान येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती महानगरपालिका नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत राजकीय पुढाऱ्यांना यापुढे असे शब्द वापरल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव कदिम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांना सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे भुसावळ पोलीस स्टेशन ने ही प्रेस नोट काढलेली आहे त्या प्रेस नोट मध्ये अपमानिक करणारे राजकीय पुढाण्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश भुसावळ पोलीस स्टेशनने दिले आहे त्याप्रमाणे जालना जिल्ह्यातील सदरील पत्र काढून दिव्यांगांना अपशब्द वापरणाऱ्या अपंग व्यक्तीचे हक्क अधिनियम २०१६ मधील शिक्षेची तरतूद कायद्यांतर्गत सहा महिने ते पाच वर्षे शिक्षा व दंडाची शिक्षा तरतूद आहे यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेने पोलीस प्रशासनाकडे निवेदन द्वारे मागणी करण्यात आली आहे या निवेदनावर सकल दिव्यांग संघटनेचे , शिवसेना दिव्यांग आघाडीचे जिल्हाअध्यक्ष अनिल मगदूले,राहुल मुळे , सुरेश बोर्डे आदींच्या साक्षरी आहेत.

## माध्यमिक विद्यालयात माता-पालक मेळावा

अंबड । प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्था अंतर्गत कै . दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी चे प्राचार्य तथा मुख्याध्यापक केशव अटकर यांनी २९ अगस्ट रोजी शाळा सुटल्यानंतर सायंकाळी ५.०० वाजेच्या नंतर पालकांच्या भेटीसाठी रामगव्हाण, बहिरगड, भद्रेगाव या गावात जाऊन पालकांचे पालक मेळावे घेतले व केशव अटकर यांनी पालकांना मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्य मंत्री राजेश भैया टोपे यांनी विद्यार्थ्यांचे



भविष्य घडवण्यासाठी गुणवत्ता पूर्ण व दर्जेदार शिक्षणासाठी,विद्यार्थ्यांच्या हिताचे कार्यक्रम राबविणे ,इंग्रजी विषयावर प्रभुत्व निर्माण करण्यासाठी राजेश भैया टोपे साहेब इंग्रजी कठीण शब्दकोश वहीमधे दररोज १० शब्द लिहून घेणे व पाठ करून घेणे पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व मुलांची काळजी,मुलांच्? आरोग्य, .मुलांचा अभ्यास, मुलांच्या येण्या जाण्याच्या बसेस बद्दल, शाळेत भेटी देण्याचे फायदे,अशा अनेक मुद्द्यावर मार्गदर्शन केले. त्यावेळी उपस्थित शाळेचे सहशिक्षक राजेंद्र मोरे ,शामल कांगणे , माता- पालक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.... माता -पालक मेळाव्याचे सूत्रसंचलन राजेंद्र सानप यांनी केले व विष्णू गणकवार यांनी गावकऱ्यांचे आभार मानले

## आनंदधाम येथे क्षमापना कार्यक्रम

अहिल्यानगर मनात द्वोष व क्लेष असला की जीवन अस्थिर बनते. आनंदी जीवनासाठी द्वोषमुक्त व क्लेषमुक्त झाले पाहिजे. क्षमापना हे जैन धर्मातील आत्मशुध्दीचे पर्व आहे. दैनंदिन जीवन जगताना प्रत्येकाकडून चुका होतात. यातून मनात कटुता निर्माण होते. राग लोभाचे परिमार्जन करणे व त्यासाठी क्षमा मागणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असते. एखाद्याला क्षमा करणे तसेच मनापासून क्षमा मागणे ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. नम्रता व क्षमाशीलता प्रत्येकाने आपल्या आचरणात आणावी हीच क्षमापना पर्वाची मुख्य शिकवण आहे, असे डॉ. अनुपमाजी यांनी येथे प्रतिपादन ले.

जैन धर्मियांच्या पवित्र पर्यूषण महापर्वामधील सामुदायिक क्षमापना कार्यक्रम आनंदधामच्या प्रांगणात झाला. क्षमा वीरस्य भूषणम् या उक्तीला अनुसरुन उपस्थित प्रत्येकाने कळत नकळत झालेल्या चुकांबद्दल हात जोडून एकमेकांची क्षमा मागितली. 'खमाव खमाव'च्या गजरात आनंदधामचे पवित्र प्रांगण दुमदुमले होते. जैन साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात हजारो भाविकांनी क्षमापना कार्यक्रमात सहभाग घेत त्यांच्या अनमोल मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

## राजमाता जिजाऊंची सुवर्णतुला, अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृतींचा शहरामध्ये देखावा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

गणेशोत्सवानिमित्त शहरभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी अध्यात्मिक व सामाजिक संदेश देणारे देखावे साकारले आहेत. त्यात राजमाता जिजाऊंची सुवर्णतुला हा देखावा साकारला आहे. जय आनंद महावीर युवक मंडळाच्या माध्यमातून पुस्तकांची भेट गरजू विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. त्याचबरोबर गरिबांना धान्य व किराणा किट वाटपाचे नियोजन आखले. अहिल्यानगर शहरात गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील गुलमोहर रस्ता, पाइपलाइन रस्ता, चितळे रस्ता, नेता सुभाष चौक, इम्पिरियल चौक आदी विविध भागात सार्वजनिक मंडळांकडून उत्सव साजरा केला जात आहे. शहरात सुमारे २५० सार्वजनिक मंडळे गणेशोत्सव साजरा करत आहेत.

उत्सव कालावधीत विविध आरासींचे आयोजन करून सामाजिक संदेश देण्यासाठीही काही मंडळींनी पुढाकार घेतला. जयआनंद महावीर युवक मंडळाच्या सुवर्णतुला देखाव्यात राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराजांसह ११ मूर्तींचा हालता देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्यात दररोज तुलेच्या रूपाने फळे, धान्य, गरजू विद्यार्थ्यांना कपडे, पुस्तकांचे वाटप करण्याचे नियोजन आहे. त्याचबरोबर किराणा किटही वाटप केले जाणार आहे, अशी माहिती मंडळाने दिली. याव्यतिरिक्त पोलिस हेडक्वार्टर समोरील महावीर प्रतिष्ठानने आयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराची २५ बाय १७ फुटांची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. तसेच नेता सुभाष तरूण मंडळाच्यावतीने चितळे रोड येथे पौराणिक देखावा साकारला आहे. त्यात १५ फुटांचा गरूड, १७ हलत्या मूर्त्यांचा देखावा आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला न्याय मिळवून देणार-ॲड. प्रकाश आंबेडकर

नेवासा । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रीय नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी वडुले (ता. नेवासा) येथे कर्जबाजारी व आत्महत्याग्रस्त अल्पभूधारक शेतकरी स्व. बाबासाहेब सरोदे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सरोदे कुटुंबाला शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर आश्वासन दिले. तसेच, या कुटुंबाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीवेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष विशाल कोळगे,



नेवासा तालुकाध्यक्ष पोपटराव सरोदे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. स्व. बाबासाहेब सरोदे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर कर्जमाफीच्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याचा आरोप करणारी व्हिडिओ क्लिप प्रसारित केली होती. ही क्लिप ॲड. आंबेडकर यांना दाखवण्यात आली. ॲड. आंबेडकर यांनी सरोदे कुटुंबाच्या भविष्यासाठी शासनाकडून विविध सवलती आणि मुलांच्या शिक्षणासाठी मदत मिळवून देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. यावेळी तालुकाध्यक्ष पोपटराव सरोदे यांनी नुकत्याच कुकाणा (ता. नेवासा) येथे वंचित बहुजन आघाडीच्यावतीने केलेल्या रस्ता रोको आंदोलनाचा उल्लेख करत, आत्महत्याग्रस्त सरोदे कुटुंबाला अद्याप कोणतीही मदत मिळाली नसल्याचे ॲड. आंबेडकर यांच्या निदर्शनास आणून दिले.

या प्रसंगी प्रा. किसन चव्हाण, विशाल कोळगे, पोपटराव सरोदे, माजी पंचायत समिती सदस्य शंकरराव भारस्कर, तालुका उपाध्यक्ष राजेंद्र साळवे, शेवगांव तालुकाध्यक्ष प्यारेलालभाई शेख, सलीम इनामदार, बलभीम सकट, अशोकराव मिसाळ, अनिल जाधव, चरण त्रिभुवन, संतोष चौधरी, बाबासाहेब अल्हाट, विजय गायकवाड, संतोष कासोदे, दीपक सरोदे, योगेश गायकवाड, उत्तम गोर्डे, किशोर भारस्कर, सागर गायकवाड, राजू पठारे, सागर चक्रनारायण, सचिन साठे, आकाश इंगळे, शिवाजी म्हस्के, अशोक शिरसाट, नितीन गोर्डे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुस्लिम दफनभूमीपर्यंत पूल व रस्ता नसल्याने अंत्यविधीसाठी करावी लागते मोठी कसरत

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी येथे शेख इब्राहिम यांचा मृत्यू झाल्याने दफनविधीच्या वेळी आलेल्या अडचणींमुळे मुस्लिम दफनभूमीपर्यंत नदीवरील पूल बांधणे व रस्ता निर्माण करण्याची मागणी गावकऱ्यांनी शासनाकडे केली आहे. या घटनेचे व्हिडिओ व छायाचित्र प्रत्यक्ष पुरावा म्हणून सादर करत सरपंच, आमदार, खासदार, पालकमंत्री उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री यांनी तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा भ्रष्टाचार निर्मूलन समिती चे अध्यक्ष इंजिनिअर सादिक इनामदार व गावकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

उपळी गावातील मयत शेख इब्राहिम यांच्या दफनाविधीसाठी गावातील



कब्रस्तान (दफनभूमी) येथे घेऊन जाताना नदी पार करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. नदीला पूर आल्यानंतर त्या पाण्याच्या पुरा मधून अंत्यविधीला पार्थिव घेऊन जाणाऱ्याच्या व्यक्तींचा सुद्धा जीवाचं बरं वाईट झालं तर याच प्रशासनाला काही

## प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी -इनामदार

घेणं देणं नाही या देशामध्ये लोकशाही आहे का ठोकशाही आहे असा सवाल उपस्थित होत आहे नदीवरील पूल नसल्याने पार्थिव नदी मधून वाहणाऱ्यां जोराच्या पाण्यामुळे खूप त्रास सहन करावा लागला. ही घटना व्हिडिओतही कैद झाली असून, ती सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या व्हिडिओला ताजे उदाहरण म्हणून गावकऱ्यांनी पुढे केले असून, यापुढे अशा अनर्थ टाळण्यासाठी शासनाने गंभीरपणे हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गावकऱ्यांनी सांगितले की, उपळी गावातील मुस्लिम दफनभूमी नदीच्या दुसऱ्या काठावर आहे. मात्र, नदी पार करण्यासाठी कोणताही पूल किंवा योग्य रस्ता नसल्याने दफनविधीच्या वेळी नेहमीच अडचणी येतात. विशेषतः पावसाळ्यात नदीला पूर आल्यास परिस्थिती आणखी गंभीर होते. या समस्या दीर्घकाळापासून सुरू आहेत, पण अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. सरपंच, आमदार, खासदार व पालकमंत्री व मुख्यमंत्री साहेबांनी याकडे वेळीच लक्ष देऊन नदीवरील पूल बांधावा आणि दफनभूमीपर्यंत रस्ता निर्माण करावा, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे इंजिनियर सादिक इनामदार व उपळी येथील गावकऱ्यांनी केली आहे. शासन व प्रशासन यांनी या मागणी संदर्भात तात्काळ मागणी मंजूर करण्यात यावी व कायदेशीर प्रश्न मार्गी लावावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असे इंजिनीयर सादिक इनामदार यांनी सांगितले.

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वात्मक कल्याणाची संकल्पना मांडली– इंद्रजित देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**पसायदान ही विश्व प्रार्थना असून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी पसायदानाच्या माध्यमातून विश्वात्मक कल्याणाची संकल्पना मांडली त्यातूनच मैत्र भाव निर्माण झाला पाहीजे व पापाचा अंधार नाहीसा होऊन ज्ञानाचा उदय व्हावा हीच मागणी पसायदानातून माऊलींनी केली असल्याचे मत कऱ्हाड येथील प्रख्यात साहित्यिक इंद्रजित देशमुख यांनी व्यक्त केले.**

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी अंतर्गत यो.शि.संस्था कर्मचारी गणेश व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी यो.शि. संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर होते.





ज्या व्यक्ती खल(वाईट प्रवृत्तीच्या) आहेत त्यांच्यातील खलत्व जावो (नष्ट होवो)अशा प्रकारे एक ना अनेक गोष्टी माऊलींनी भगवंताकडे प्रेम बुध्दीने मागितल्या. सर्व प्राणिमात्रांमध्ये स्नेहाची, प्रेमाची भावना निर्माण व्हावी त्यांच्या मनातील, शरीरातील दुष्ट भावनांचा नाश व्हावा त्याच प्रमाणे माणुसकी धर्म नसानसातून रुजावा स्वधर्म जोपासल्या जाव आणि अशा सकारात्मक गोष्टी घडून आल्यास सुर्यतेजाने विश्वातील प्रत्येकाचे जीवन उजळून निघेल व अखिल विश्वात शांती, ज्ञान,समृद्धी,समाधान व हृदय विशाल होईल असेही ते म्हणाले. प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत संस्थेच्या वतीने करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय शिवकन्या सांळुके यांनी करून दिला.कार्यक्रमाचे संचालन करून उपस्थितांचे आभार शिल्पा थोरात यांनी मानले.यावेळी प्रतिष्ठित नागरिक ,संस्थेचे पदाधिकारी,संचालक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिवृष्टीने बाधित सरसकट पिकांचे पंचनामे करा -धनंजय मुंडे

## परळी मतदारसंघात पावसाने झालेल्या नुकसानीचा धनंजय मुंडे यांनी घेतला आढावा

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ मतदारसंघात १५ जुलै नंतर पावसाचा जोर वाढत गेला, मागच्या काही दिवसात तर पावसाने शेती पिकांचे प्रचंड नुकसान केले असून अनेक ठिकाणी अजूनही शेतामध्ये गुडघाभर पाणी साचलेले आहे. त्यामुळे खरिपातील पिकांचे मोठे नुकसान होत असून, झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशा सूचना आज माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी स्थानिक प्रशासनास दिल्या आहेत; तसेच याबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा करून संबंधितांना तसे आदेश देण्याचे सुचित केले आहे.**





परळी मतदारसंघात मागच्या काही दिवसात अतिवृष्टी व अति पावसाने झालेल्या नुकसानीचा समग्र आढावा आज धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मार्फत घेण्यात आला. यावेळी श्री मुंडे यांनी मंडळ आणि गाव निहाय झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. पावसामुळे ग्रामीण व शहरी भागात घरांची झालेली पडझड, पशूंची झालेली हानी याबाबत स्वतंत्र पंचनामे करणे तसेच स्थानिक आपत्ती निवारण निधीतून संसार उपयोगी साहित्याचे नुकसान झाले असल्यास त्याबाबतचे तात्काळ द्यावयाचे अनुदान याबाबतही

◀◀ पान २ वर

# गुटखा बंदी तरी प्रशासकीय कार्यालयांच्या भिंती लालबुंद

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने २०१२ पासून संपूर्ण राज्यभर गुटखा, सुगंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी घालून तो गंभीर गुन्हा ठरवला आहे. तरीदेखील बीड शहरात गुटखा टपऱ्या, किराणा दुकानांवर सहज उपलब्ध आहे. प्रश्न असा की, बंदी असलेला गुटखा येतो कुठून आणि जातो कुठे?**

शहरातील अनेक प्रशासकीय कार्यालयांचे कोपरे, शौचालये,

◀◀ पान २ वर





## जनतेचे प्रश्न :

- ✻ गुटखा बंदी असूनही बीडमध्ये गुटखा विक्रीसाठी येतो कुठून?
- ✻ जप्त केलेला गुटखा सुरक्षितपणे नष्ट केला जातो का?
- ✻ प्रशासनातल्या कोणत्या अधिकाऱ्यांच्या छत्रछायेखाली गुटखा माफिया चालतात?
- ✻ जनतेला व्यसनमुक्तीचे धडे देणाऱ्या कार्यालयांच्या भिंती गुटख्याने माखलेल्या कशा?

## कठोर कारवाई करण्याची मागणी

बीडकरांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या गुटखा माफियावर गुन्हेगारी कारवाई, मनी लॉन्डरिंग तपास, तसेच अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे हाच जनतेचा आवाज आहे. अन्यथा गुटखा बंदी ही केवळ फाइलवरची बंदी ठरून शहर गुटखा माफियांच्या ताब्यातच राहणार आहे

रामनाथ खोड
सामाजिक कार्यकर्ता

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा - आ.क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा क्षेत्रात मागील दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे पूर्ण करुन सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी आ. संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर (का) तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पावसाने क्षेत्रातील



पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या क्षेत्रातील उभा असलेला कापूस, सोयाबीन, बाजरी आदीं पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच पशुहानीसह शेतकरी व ग्रामस्थांच्या घरांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या घरांचे, पिकांचे व पशुहानीचे तातडीने पंचमाने करण्यासाठी बाबतचे आदेश विभागाला द्यावेत, जेणेकरून शेतकरी बांधवाला सरसकट आर्थिक मदत मिळेल. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रातून केली आहे.



**बीड : विधान परिषद सदस्य आ. अमित गोरखे हे शनिवारी बीड शहरात आले होते. महात्मा फुले युवा दलाच्या वतीने त्यांचे शहरात स्वागत करण्यात आले. यावेळी महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे, उपजिल्हाप्रमुख संजय काळे, पंकज बाहेगव्हाणकर, प्रदीप मोराळे ,मनोज बांगर आदी उपस्थित होते.**

# भीषण अपघातानंतर डॉ.योगेश क्षीरसागरांची रुग्णालयामध्ये धाव; कुटुंबियांना दिला धीर

## पालकमंत्री अजित पवार यांच्यामार्फत प्रशासनाला केल्या मदतीच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पेंडगाव येथे श्री हनुमानरायांच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांना कंटेनरने जोरदार धडक दिली. यात सहा भाविकांचा मृत्यू झाल्याची घटना शहराजवळील नामलगाव फाटा परिसरात शनिवारी (दि.३०) सकाळी घडली. अपघाताची माहिती



मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी तातडीने जिल्हा रुग्णालय गाठले. अपघातग्रस्त कुटुंबियांना धीर दिला.

अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांशी संवाद साधत संपूर्ण परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी थेट उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा

◀◀ पान २ वर

# डॉ.वासुदेव मुलाटे यांना स्व.लोमटे स्मृती राज्य पुरस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाईचा दरवर्षी दिला जाणार स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार २ संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक वासुदेव मुलाटे यांना देण्यात येणार आहे माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी आहे. समितीच्या बैठकीत हा निर्णय घे आला. यावेळी समितीचे भगवानराव बाप्पा, सतीश लोमटे, प्राचार्य डॉ. प्र प्रयाग, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्रा. वैद्य व प्रा. भगवान शिंदे व आदि सदस्य उपस्थित होते. साहित्य, पत्रकारिता, संगीत, नाट्य, शिक्षण, क्रीडा, सहकार व सुसंस्कृत राजकारणी, आदि क्षेत्रातील राज्यातील एका व्यक्तीस हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. यापूर्वी



हा पुरस्कार सर्वश्री यशवंतराव गडाख पाटील, पद्मश्री ना. धों. महानोर, विजय कुवळेकर, रामदास फुटाणे, पंडीत नाथराव नेरळकर, विजय कर भावे, प्राचार्य रा. रं. बोराडे, पवार, पद्मश्री डॉ. यू. म. पठाण, वंदनशिव व पद्मश्री सतीश आळेकर गेला आहे. हा यावर्षीचा १३ वा वासुदेव मुलाटे यांना देण्यात येणार काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, शाल, ुष्पहार व रोख पंचवीस हजार रुपये येत्या १९ सप्टेंबर २०२५ शुक्रवार राजा मान्यवरांच्या हस्ते अंबाजोगाई येथे पुरस्कार वितरण केला जाणार आहे अशीही माहिती लोमटे यांनी दिली.

डॉ. वासुदेव मुलाटे हे एक महत्वाचे लेखक मराठी साहित्याच्या विश्वासात बीड जिल्ह्याने दिले आहेत. अंधाररंग, अबॉर्शन आणि इतर कथा, काळोखवेणा, झाड आणि समंध, व्यथाफूल हे कथा संग्रह व मराठवाड्याची कथा, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास हे ग्रंथ आहेत. उलगुलान आणि तडजोड: एक आकलन, ग्रामीण साहित्य चळवळ एक ध्यासपर्व, ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, चिंतनाच्या क्षितिजावर, झाकोळलेल्या वाटा हे आत्मकथन, दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप, नवे साहित्य नवे आकलन, बिंब प्रतिबिंब, मनातलं आभाळ – ललित लेख, विषवृक्षाच्या मुळ्या – कादंबरी, शेतकऱ्यांचा असूड, शोध जाणिवांचा ही समीक्षात्मक, संशोधनात्मक ग्रंथा बरोबरच हार्ट क्रॅकर – विनोदी एकांकिका त्यांनी लिहिली आहे.

# माजलगाव धरणाचे सात दरवाजे उघडले

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्यातील सर्वात मोठे दुस-या क्रमांकाचे धरण म्हणुन ओळख असलेले माजलगाव धरण शंभर टक्के भरले आहे.धरणात १७८२३ हजार क्युसेक वेगाने पाण्याची आवक आहे.दरम्यान धरणाचे सात दरवाजे उघडण्यात आले असून सिंदफणा नदी पात्रात १३९८९ क्युसेसने पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे.मागच्या दहा वर्षात



## १३९८९ क्युसेसने पाण्याचा विसर्ग

## १० वर्षात ६ वेळेस भरले १०० टक्के धरण

## धरणात १७,८२३ क्युसेकने आवक सुरू

माजलगाव धरण १००% सहाव्यांदा भरल्याची ही घटना आहे.

माजलगाव धरण पुर्ण क्षमतेने भरल्यामुळे दि २९ ऑगस्ट शुक्रवार रोजी रात्री १०:०० वाजता तीन गेटमधून ५९०० क्युसेस पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडण्यात आले होते.दि ३० ऑगस्ट शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजण्याच्या दरम्यान धरणाचे दोन गेट सोडण्यात

◀◀ पान २ वर

# पाच वर्षांनंतर बिंदुसरा नदी भरभरून वाहू लागली!





## जिल्हा प्रशासनाच्या स्वच्छता मोहिमेचा यशस्वी परिणाम

बीड । प्रतिनिधी

शहराच्या मध्यभागातून वाहणारी बिंदुसरा नदी तब्बल पाच–सहा वर्षांच्या खंडानंतर पुन्हा भरभरून वाहू लागली आहे. जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या नदीपात्र स्वच्छता मोहिमेमुळे नदीला जणू नवा श्वास मिळाल्याचे चित्र बीडच्या नागरिकांना बघायला मिळाले आहे

अतिक्रमण व बाभळीच्या झाडांमुळे बिंदुसरा नदीचा प्रवाह गेल्या काही वर्षांत बाभळीच्या झाडांनी, काट्याकुट्यांनी आणि अतिक्रमणाने इतके व्यापले होते की पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवला जात होता. परिणामी, पावसाळ्यातही नदी नाल्या सारखी वाटायची ती कोरडी असली की कचरा कुंड्या सारखी दिसायची आणि तिचं पात्र ही अर्धवट दिसायचं. परंतु जिल्हा प्रशासनाच्या स्वच्छता मोहिमेत नदीपात्रातील झाडाझुडपे, गाळ आणि अतिक्रमण हटवण्यात आले. ज्यामुळे नदीचे पात्र मोकळे झाले आणि नदी पात्रातून पावसाचे पाणी निर्बंधांशिवाय वाहू लागले.नदीला सध्या नवा श्वास मिळाला असला तरी प्रदूषण, घनकचरा व अतिक्रमण यावर नियंत्रण नसेल तर ही स्थिती तात्पुरती ठरू शकते.

नदी वाहिनीची जबाबदारी ही केवळ प्रशासनाची नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.म्हणून बिंदुसरा नदीला मिळालेला हा नवजीवन क्षणिक न ठरता कायमस्वरूपी व्हावा, यासाठी प्रशासनाबरोबर नागरिकांनीही पुढाकार घ्यावा – हीच काळाची गरज आहे.नदीचं खरं सौंदर्य असंच कायम राहण्यासाठी प्रशासनाने ही मोहीम सातत्याने सुरू ठेवली पाहिजे, अन्यथा पुन्हा घाण आणि झाडं झूडपं उगवून नदी पुन्हा गुदमरू शकते.

# शिरूर तालुक्यातील विवाहितेचा हुंडाबळी

## बावी येथील घटना; घर बांधण्यासाठी दहा लाखाची मागणी

शिरूर । प्रतिनिधी

घर बांधण्यासाठी वडीलाकडून दहा लाख रुपये घेऊन ये, असे म्हणत चौघांनी संगणमत करून नवविवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याने या छळाला कंटाळून नवविवाहितेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना शिरूर तालुक्यातील बावी या गावी गुरुवार दि. २८ ऑगस्टच्या पहाटे घडली आहे. याप्रकरणी मयत विवाहितेच्या फिर्यादीवरून पती, सासू, मामे सासरा, यांच्या



विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन(तांबा) येथील शिवदत्त विठ्ठल पंडित यांची मुलगी करिष्मा हिचा साडेचार वर्षांपूर्वी सचिन नवनाथ सांगळे रा. कुसळंम हल्ली मुक्काम बावी तालुका शिरूर याच्याशी विवाह झाला होता. विवाह नंतर पुढील तीन वर्ष यांचा संसारही सुखरूप होता. गेल्या वर्षभरापूर्वी हे दाम्पत्य सासू अरुणा सांगळे यांच्या शिरूर तालुक्यातील बावी या मामाच्या गावी शेतातील घरामध्ये राहत होते. करिष्माने वडिलाकडून घर बांधण्यासाठी दहा लाख रुपये घेऊन यावेत अशी मागणी पती सचिन नवनाथ सांगळे, सासू अरुणा नवनाथ सांगळे, मामे सासरा भगवान रामभाऊ राऊत, मामे भाऊ तुकाराम

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार, दि.३१ ऑगस्ट २०२५ । पान ७

# श्री क्षेत्र ओझर येथील गणेश जयंती उत्सवाची भव्य कुस्ती आखाड्याने सांगता

ओझर

श्री क्षेत्र ओझर येथे भाद्रपद गणेश जयंतीनिमित्त गेल्या पाच दिवसांपासून सुरू असलेल्या जन्मोत्सव सोहळ्याचा समारोप भव्य कुस्ती आखाड्याने झाला. विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व विश्वस्त मंडळाच्या सहभागाने हा आखाडा यशस्वीपणे संपन्न झाला. विशेष म्हणजे, यंदा महिलांच्या कुस्त्याही आयोजित करण्यात आल्या होत्या, ज्यामुळे आखाड्याला वेगळीच रंगत आली.



पुणे, सोलापूर, नगर, मुंबई आणि सातारा जिल्ह्यांतील नामवंत मल्लांनी या आखाड्यात सहभाग घेतला. ओझरसह शिरोली बुद्रुक, शिरोली खुर्द, तेजेवाडी, धालेवाडी, हिवरे बुद्रुक, हिवरे खुर्द आदी गावांमधील कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. आखाड्याचे लिलाव माजी विद्यार्थी संघटना, श्रीक्षेत्र ओझर (रु. १,५५,५५५), २००७ एस.एस.सी. बॅच (रु. ७७,७७७) आणि पानसुपारीचे लिलावदार विलास सोनू कवडे (रु. ५५,०००) यांनी जिंकले. या सर्वांचा जाहीर सत्कार करण्यात आला, तसेच त्यांची ढोल-ताशांच्या गजरात ओपन जिपमधून मिरवणूक काढण्यात आली.

आखाड्याचे पंच म्हणून लक्ष्मण टेंभेकर, किशोर कवडे, गणेश राऊत, मंगेश मांडे, शहाजी रवळे, विनायक मांडे, पोलीस पाटील मोहन रवळे आणि गणपत कवडे यांनी जबाबदारी सांभाळली. समालोचन विश्वस्त सूर्यकांत रवळे आणि कैलास मांडे यांनी केले. या प्रसंगी आमदार अतुल बेनके, देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष शाकुजी कवडे, ग्रामविकास अध्यक्ष संतोष मांडे, विश्वस्त आनंदराव मांडे, रंगनाथ रवळे, गणपत कवडे, हिवरे गावचे सरपंच निलेश बेनके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

आखाड्यात एकूण सात कुस्त्या झाल्या, ज्यामध्ये ५,००० ते ११,००० रुपयांपर्यंत इनाम होत्या. शेवटची कुस्ती पिंपळवंडी येथील राहुल फुलमाळी आणि राहुली येथील अनिल ब्राह्मणे यांच्यात झाली, ज्यात अनिल ब्राह्मणे यांनी ११,००० रुपयांचे इनाम जिंकले. यात्रा उत्सवाचे नियोजन विघ्नहर गणपती ट्रस्ट आणि ग्रामविकास संस्था, ओझर यांनी केले.

अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे, सचिव सुनिल घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे, विश्वस्त प्रकाश मांडे, सूर्यकांत रवळे, गोविंद कवडे, विक्रम कवडे, समीर मांडे, विनायक मांडे, संतोष कवडे, विलास कवडे, मंगेश पोखरकर, विनायक जाधव, शिल्पा जगदाळे, देवस्थानचे व्यवस्थापक आणि ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले. यात्रेची सांगता रात्री ९ वाजता विघ्नहर सांस्कृतिक भवन येथे महाराष्ट्राची गौरवगाथा या लोकनृत्याच्या कार्यक्रमाने झाली. उदय साठम यांच्या ५५ कलाकारांच्या संचाने उपस्थितांचे मनोरंजन केले.



# शिरूरमध्ये भटके विमुक्त दिवसानिमित्त ३१ ऑगस्ट रोजी न्हावरा येथे शिबिराचे आयोजन

शिरूर । प्रतिनिधी

पुणे जिल्हाधिकारी आणि शासनाच्या निर्देशानुसार शिरूर तालुक्यात 'भटके विमुक्त दिवस' मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. यानिमित्ताने मौजे न्हावरा (ता. शिरूर) येथील साईनाथ मंगल कार्यालय, आंधळगाव फाटा येथे रविवार, ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता एक विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात भटक्या आणि विमुक्त समाजाच्या संस्कृती, जीवनमूल्ये आणि परंपरांचा जागर करणारे सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम आणि माहितीपर सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. समाजातील विद्यार्थी आणि युवकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, आधार कार्ड नोंदणी, जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन केले जाईल.याशिवाय, शासकीय विभागांमार्फत भटक्या आणि विमुक्त समाजाच्या प्रगतीसाठी राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात येणार आहे.तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांनी आवाहन केले आहे की, शिरूर तालुक्यातील भटक्या आणि विमुक्त जाती-जमातीतील सर्व नागरिकांनी या शिबिराचा पुरेपूर लाभ घ्यावा आणि शासनाने उपलब्ध करून दिलेल्या संधींचा उपयोग करून आपल्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करावा. या शिबिरामुळे भटक्या आणि विमुक्त समाजाला सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाची नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.

# गड किल्ल्यांना जागतिक ओळख! शिवेंद्रराजेंच्या हस्ते देखाव्याचे उद्घाटन

पुणे । प्रतिनिधी

एकाच देशातून एकाच वेळी बारा वास्तूंना हेरिटेजचा दर्जा मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले आहे. महाराष्ट्रातील गड किल्ले हे केवळ शिवाजी महाराजांशी किंवा इतिहासाशी संबंधित आहेत असे नाही, तर महाराष्ट्र भूमीची ते ओळख आहेत. म्हणून त्यांना हेरिटेज दर्जा मिळणे आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, अशी भावना छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज आमदार शिवेंद्र राजे भोसले यांनी व्यक्त केली.



शनिवार पेठ मेहुणपुरा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात युनेस्को वर्ल्ड हेरिटेजमध्ये समाविष्ट १२ किल्ल्यांची प्रतिकृती आणि त्यांचा इतिहास सांगणारी ध्वनी चित्रफीत असा देखावा सादर करण्यात आला आहे. या देखाव्याचे उद्घाटन शिवेंद्र राजे यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी नगरसेविका गायत्री खडके, इतिहास अभ्यासक मोहन शेटे, मंडळाचे अध्यक्ष सचिन शिंदे, उपाध्यक्ष अनंत कावणकर, सचिव पराग ठाकूर, कार्याध्यक्ष कौस्तुभ गोखले, गिरीश सरदेशपांडे, महेश काटदरे उपस्थित होते.युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसास्थळ म्हणून नामांकित केले आहे.

त्यानिमित्त शनिवार पेठ मेहुणपुरा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या वतीने शिवजन्म ते शिवराज्याभिषेक असा प्रवास किल्ल्यांच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे. रायगड स्मारक मंडळ, कात्रज शिवसृष्टी आणि नारळकर इन्स्टिट्यूट यांच्या सहकार्याने हा देखावा साकारण्यात आला आहे, असे ठाकूर यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज किती महान होते हे आपल्याला माहिती आहे, परंतु जगाला त्याचा परिचय नव्हता. युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज साईटमध्ये समावेश झाल्यानंतर महाराजांचे कर्तृत्व जगाला कळले आहे. त्याचप्रमाणे शिवचरित्रसुद्धा जगभर पोहोचले पाहिजे. शिवाजी महाराजांची आठवण करून देणाऱ्या किल्ल्यांच्या प्रतिकृती मेहुणपुरा गणेशोत्सव मंडळात साकारण्यात आल्या आहेत. हे गड किल्ले जिवंत शाहीर आहेत, असे शेटे यांनी नमूद केले.

# 'गोंद्या आला रे आला' देखाव्यातून चापेकर बंधूंचा शौर्यगौरव

पुणे । प्रतिनिधी

'गोंद्या आला रे आला' हे सांकेतिक शब्द वापरून दिनांक २२ जून १८९७ रोजी चापेकर बंधूंनी इंग्रज अधिकारी रँडचा वध करून ब्रिटिश साम्राज्याच्या दडपशाहीला थेट आव्हान दिले. आपल्या कृत्याचा शेवट फाशीमध्ये होईल, याची पूर्ण जाणीव असूनही त्यांनी स्वातंत्र्याच्या कार्यासाठी पुढे पाऊल टाकले. एवढेच नव्हे, तर यातील दोन भावंडांना बायका-मुले असतानाही त्यांनी मातृभूमीच्या प्रेमासाठी आपल्या संसाराला आणि प्राणाला तिलांजली दिली.

हा सगळा स्वातंत्र्यलढा जिवंत करण्याचे कार्य माती गणपतीच्या यंदाच्या देखाव्यात करण्यात आले आहे.नारायण पेठ माती गणपती मंडळ ट्रस्टच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात 'गोंद्या आला रे आला' हा सजीव देखावा सादर करण्यात येत आहे. देखाव्याचे उद्घाटन लोकमान्य टिळक यांचे खापर पणतू डॉ. रोहित टिळक यांच्या हस्ते झाले.





प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. निवेदिता एकबोटे, परेश हराळे, विशाल नांगरे, महेश हराळे, शुभम आदवडे, निखिल देशपांडे, मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मारवा क्रिएशन यांनी देखाव्याची निर्मिती केली असून लेखन दिग्दर्शन राहुल गाजरे प्रज्ञा दंडवते यांचे आहे.माती गणपती मंडळ नेहमीच अतिशय चांगले उपक्रम राबवत असते.


वर्षभर आयोजित शिबिरे आणि कोविड काळात केलेले कार्य हाच टिळकांना अपेक्षित गणेशोत्सव आहे. अशा उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी निर्माण होते. 'गोंद्या आला रे आला' या देखाव्यातून इतिहासाची ओळख तर होतेच, पण समाजात सामाजिक जाणीवही दृढ होते. आजच्या धावपळीच्या जीवनात आपण बलिदान विसरतो, तसे होऊ नये, असे डॉ. रोहित टिळक म्हणाले.

माती गणपती मंडळाचा उद्देश केवळ धार्मिक सण साजरा करण्यापुरता मर्यादित नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जाणीवा जनमानसात रुजवणे हाही आहे. या देखाव्याद्वारे आम्ही चापेकर बंधूंचे शौर्य, त्याग आणि देशभक्ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहोत. 'गणेशोत्सव हा लोकशिक्षणाचा उत्सव असावा', ही लोकमान्य टिळकांची कल्पना होती, त्याच धर्तीवर आमचे उपक्रम राबवले जातात. या देखाव्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे, असे कौस्तुभ खाकुर्डीकर म्हणाले.

# भोरमधील किकवीत गणेशोत्सवात अनोखा देखावा; साकारली अयोध्येतील राम मंदिराची हुबेहूब प्रतिकृती

**भोर । प्रतिनिधी**

**भोर तालुक्यातील किकवी गावात यंदाच्या गणेशोत्सवाला एक अनोखा आणि आकर्षक देखावा साकारण्यात आला आहे. गावातील रहिवासी आणि विद्या ऑनलाइन प्रायव्हेट लिमिटेड या सॉफ्टवेअर कंपनीचे मालक अनिल लक्ष्मण यादव यांनी आपल्या घरी अयोध्येतील राम मंदिराची हुबेहूब प्रतिकृती उभारली आहे. या रचनेने गावकऱ्यांसह भाविकांना खऱ्या राम मंदिरात प्रवेश केल्याचा अनुभव दिला आहे.**



या देखाव्यासाठी पुष्टा एमडीएफ, दोरा आणि ऑइल पेंटचा वापर करून अत्यंत बारकाईने रचना तयार करण्यात आली आहे. विशेषतः गर्भगृहातील श्रीरामांच्या मूर्तीला प्रकाशयोजना आणि कलात्मक सजावटीमुळे मंदिरातील वास्तविक गर्भगृहाचा भास होतो. यामुळे भाविकांना अयोध्येतील राम मंदिराचे प्रत्यक्ष दर्शन घडत आहे.

अनिल यादव यांच्या पत्नी रत्नमाला अनिल यादव, ज्या कामथडी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत, यांनीही कलेच्या आवडीतून या देखाव्याच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या दाम्पत्याच्या संयुक्त प्रयत्नांनी साकारलेली ही रचना गणेशोत्सवात किकवी गावाचे प्रमुख आकर्षण ठरलीआहे.

हा देखावा पाहण्यासाठी गावकरी आणि भाविक मोठ्या संख्येने भेट देत असून, अप्रतिम शिल्पकला आणि भक्तिमय वातावरणाने सर्वांचे मन जिंकले आहे. किकवी गावात या गणेशोत्सवाला श्रद्धा आणि कलेचा अनोखा संगम पाहायला मिळत आहे.



# वाघोलीत रणरागिनी महिला गणेश मंडळातर्फे बाप्पाचे आगमन

वाघोली । प्रतिनिधी

तेजस्विनी सामाजिक संस्था यांच्या रणरागिनी महिला गणेश मंडळातर्फे यंदा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भक्ती, आनंद आणि कृपेचं अद्भुत दर्शन गणरायाच्या रूपाने भाविकांना लाभलं.

मंडळाचा हा सलग तिसऱ्या वर्षांचा उत्सव असून, यंदाही मंडळाने सुंदर सजावट, पारंपरिक शृंगार आणि महिलांनी एकत्र येऊन केलेल्या आकर्षक आरासीतून बाप्पाचे स्वागत केले. संपूर्ण मंडपात दिव्य वातावरणाची निर्मिती झाली होती. महिलांना सामाजिक कार्याची प्रेरणा मिळावी, यासाठी रणरागिनी महिला गणेश मंडळ विविध उपक्रम राबवते. सामाजिक बांधिलकी जोपासत उत्सवाला एक नवा सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न होत असल्याचे तेजस्विनी सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सारिका किरण पवार यांनी सांगितले.

# मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, याबाबतीत कोणाचही दुमत नाही, पण....; दत्तात्रय भरणे स्पष्टच बोलले

बारामती । प्रतिनिधी

मराठा समाजाच्या आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे. शासनाने राधाकृष्ण विखे पाटील यांची समिती यासाठी नेमली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे, आम्ही सगळेजण सहमत आहोत. मात्र ते आरक्षण देतांना ते आरक्षण टिकलं पाहिजे. मनोज जरांगे यांचे पदाधिकारी आणि समिती यांच्यात लवकरच वाटाघाटी सुरू होईल. आणि योग्य तो निर्णय होईल. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, याबाबतीत कोणाचही दुमत नाही. परंतु ते आरक्षण टिकलं पाहिजे. अशी भूमिका कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी बोलताना व्यक्त केली आहे. ते इंदापूर येथे बोलत होते.



मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईत उपोषण सुरु केलं आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे. महाराष्ट्रातून लाखो मराठा आंदोलक गाड्या घेऊन मुंबईत दाखल झाले आहेत. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा जो विषय आहे. त्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. यासाठी राधाकृष्ण विखे पाटील यांचे याबाबतीत लक्ष आहे. विखे पाटील याबाबतीत निश्चित प्रकारे लक्ष घालतील आणि लवकरच योग्य तो निर्णय होईल. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार निश्चित प्रकारे लवकरात लवकर मार्ग काढतील आणि योग्य तो निर्णय होईल. शिवाय मराठा विरुद्ध ओबीसी असा कुठेही वाद होणार नाही. किंबहुना वाद कोणी लावू नये म्हणजे वाद होणार नाही. असेही कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले.

# शिक्रापूरमध्ये थरार..! अट्टल गुंडांवर सातारा पोलिसांचा गोळीबार

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर परिसरात आज सकाळी पोलिस व आरोपींमध्ये थरारक धुमश्चक्री झाली. सोनसाखळी चोरीतील आरोपींना पकडण्यासाठी आलेल्या सातारा पोलिसांच्या पथकावर आरोपींनी प्रतिकार करत चाकूने हल्ला केला. स्वसंरक्षणासाठी केलेल्या गोळीबारात लखन भोसले हा आरोपी जखमी झाला असून त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोनसाखळी चोरीतील तिघा आरोपींवर पोलिसांची नजर होती. त्यांना पकडण्यासाठी सातारा पोलिसांचे पथक शिक्रापूर परिसरात गेले. त्यावेळी आरोपी लखन जाधव उर्फ भोसले याने एका पोलीस कर्मचाऱ्यावर चाकूने हल्ला केला. या अचानक हल्ल्यामुळे पोलिसांना स्वसंरक्षणार्थ गोळी झाडावी लागली. गोळी आरोपीच्या कमरेत लागल्याने तो गंभीर जखमी झाला.

दरम्यान, या झटापटीत इतर दोन आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे. शिक्रापूर परिसरात अचानक झालेल्या या घटनेमुळे काही काळ खळबळ उडाली होती.

# माळेगाव महावितरणच्या कर्मचाऱ्यांना गणेश मंडळांकडून मानाचा मुजरा

बारामती । प्रतिनिधी

माळेगाव बुद्रुक येथील महावितरण शाखेच्या नियोजनबद्ध आणि अथक प्रयत्नांमुळे यंदाच्या गणेशोत्सवात संपूर्ण गावात उत्साह आणि समाधानाचे वातावरण पसरले आहे. गणपती उत्सवापूर्वी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठ्याशी संबंधित सर्व कामे वेळेत पूर्ण केल्याने वीज खंडित होण्याच्या तक्रारी पूर्णपणे थांबल्या आहेत.



महावितरणने गणेशोत्सवापूर्वी झाडांच्या फांद्या छाटणे, दिवाबत्ती दुरुस्ती, आणि वीज वाहिन्यांची तपासणी व दुरुस्ती ही कामे यशस्वीपणे पार पाडली. यामुळे गणपती मंडळांच्या आरत्या वेळेवर होत असून, घरगुती गणपती पूजा आणि प्रसाद वाटपही अखंडितपणे सुरू आहे. यामुळे नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागलेला नाही. ग्रामस्थ आणि गणेश मंडळांनी महावितरणच्या कार्यक्षमतेचे तोंडभरून कौतुक केले आहे.

नवयुग गणेश उत्सव मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष योगेश रासकर म्हणाले, यंदाच्या गणेशोत्सवात माळेगाव महावितरण शाखेने आम्हाला खूप सहकार्य केले. वीजपुरवठा अखंडित राहिल्याने आमच्या मंडळाचे सर्व कार्यक्रम नियोजित वेळेत पार पडत आहेत. यासाठी आम्ही कनिष्ठ अभियंता सूरज ठोंबरे आणि सर्व जनमित्रांचा सत्कार करणार आहोत.

माळेगाव महावितरण शाखेचे कनिष्ठ अभियंता सूरज ठोंबरे यांच्यासह जनमित्र लघु जाधव, राजेश इंगळे, निलेश होले, अनंत सावंत, आजिनाथ गर्जे, विठ्ठल चंदनकर, अनिल ठाकरे, किशोर ननावरे, निलेश सोलकर, भारत तावरे, अक्षय जाधव, उमेश पैठणकर, संकेत साळुंखे, आदित्य नलगे आणि यश शिंदे यांनी गणेशोत्सव काळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष काळजी घेतली आहे. महावितरणच्या या सजगतेमुळे माळेगावात गणेशोत्सवाचा उत्साह द्विगुणित झाला असून, नागरिकांमध्ये विश्वास आणि समाधान निर्माण झाले आहे. सार्वजनिक संस्थांच्या सहकार्याने हा उत्सव अधिक आनंददायी ठरत आहे.

# शिरोली बुद्रुक येथील पुलाची दुरावस्था; ग्रामस्थांनी दिला आंदोलनाचा इशारा

जुन्नर । प्रतिनिधी

तालुक्यातील शिरोली बुद्रुक येथील दोन गावांना जोडणाऱ्या पुलाची दुरावस्था गंभीर बनली आहे. १९८२ मध्ये बांधलेल्या या पुलाची उंची सुरुवातीला ४ फूट होती, परंतु वारंवार भराव टाकल्याने ती आता केवळ १ फूट राहिली आहे. यामुळे दुचाकी, चारचाकी वाहने, पादचारी आणि शाळकरी मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पुलावरील खड्डे, बंद झालेले पाण्याचा निचरा करणारे पाईप आणि पावसाचे साठलेले पाणी यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. विघ्नहर साखर कारखान्याने संरक्षक जाळी बसविल्याने काही प्रमाणात धोका कमी झाला असला, तरी समस्येचे निराकरण झालेले नाही.



हा पूल शिरोली खुर्द, तेजवाडी, कुमशेत आणि ओझर या गावांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. शिरोली बुद्रुक येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये येणाऱ्या निम्म्या विद्यार्थ्यांना या पुलाचा वापर करावा लागतो. ज्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत ग्रामस्थांनी तालुका आमदार शरद सोनवणे यांच्याकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

जुन्नर तालुका शेतकरी संघटनेचे युवा अध्यक्ष सचिन थोरवे यांनी पुलाच्या दुरुस्तीसाठी त्वरित कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे, तर सरपंच प्रदीप थोरवे यांनी प्रशासनाच्या गलथान कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता केशव जाधव यांनी हा पूल जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येत असल्याचे सांगितले, तर पंचायत समिती बांधकाम विभागाचे उपअभियंता परदेशी यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.